अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १६९ । गुरूवार २ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## भक्ती व शक्ति संगम श्री हनुमान

**'सहजयोग' भाग १४**



श्री हनुमानजींमध्ये शक्ति व भक्तीचा संगम पाहण्यासारखा आहे. सहजयोग्यांसाठी श्री हनुमान हे एक आदर्श आहेत. ते आपल्या पूर्ण उजव्या बाजूवर कार्य करत असतात. तेच तुम्हाला जरुर ते मार्गदर्शन करतात, सदैव विवेक देतात. मदत करतात आणि तुमच्या संरक्षणाची काळजी घेतात. तसेच तुमच्या अहंकारावर नियंत्रण ठेवतात. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते तुम्हाला गुरुविषयी समर्पणाची शक्ति देतात.

श्री हनुमानांनी जे मिळवलं होतं, जर आपण आपल्या हृदया मध्ये बसलेल्या आत्म्याचं दर्शन घेतलं, जर आपल्याला आत्म साक्षात्कार झाला तर आपल्या पुढे कोणाताही प्रश्न उभा राहणार नाही. सर्व, दु:ख, दैन्य, दारिद्र्य दूर होऊ शकतं. आपल्या मध्ये अनेक तत्वे आहेत, ती अजुन झोपलेली आहेत, ती जागृत व्हायला पाहिजे. ती जागृत झाल्या शिवाय, आपल्याला काही अर्थ लागलेला नाही. म्हणजे असं आहे की, अजून आपला संबंध परमेश्वराशी झालेला नाही. जो पर्यंत आपला संबंध परमेश्वराशी होत नाही तेव्हा आपण त्याच्या साम्राज्यात कसे येणार.आणि त्याचं जे काय वरदान आहे ते आपल्याला कसं मिळणार. म्हणून आपला संबंध परमेश्वराशी झाला पाहिजे.

हनुमान पूजा, पुणे ३१/०३/१९९९

# श्रीरामपूरच्या 'कॉटन फाइल्स'चा नाशिक पोलिसांकडून पर्दाफाश!

- **बोगस कापूस गाठींवर कोट्यावधींचा कर्ज घोटाळा**
- **पैसे हडपण्यासाठी शेतकऱ्यांना बनवले बळीचा बकरा**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नांदगाव/नाशिक : नाशिक जिल्ह्यातल्या 'खरात फाईल्स'ने राज्यासह देशाला हादरवले. त्याचप्रमाणेच बोगस कापूसगाठी तारण ठेवून बँकांचे कोट्यावधी रुपये हडपण्याचा 'कॉटन फाइल्स'चा कोट्यावधींचा आर्थिक घोटाळा नाशिक पोलिसांनी समोर आणला आहे. विशेष म्हणजे बँकेची कोट्यावधींची फसवणूक करणाऱ्या या टोळीचा सूत्रधार श्रीरामपूर तालुक्यातील आहे.**

नांदगाव पोलिस ठाण्यात १७ डिसेंबर २०२५ रोजी दाखल झालेल्या एफआयआरनुसार, एका कंपनीने खराब कापूस गाठी (कॉटन बेल्स) गोडाऊनमध्ये ठेवून त्यांचे सातत्यपूर्ण मूल्यांकन दाखवत एचडीएफसी बँकेकडून पाच कोटी रुपयांचे बोगस कर्ज उचलले. हे कर्ज श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळ वाडगाव येथील शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले. नंतर या शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन किंवा दबावाखाली त्यांच्याकडून पूर्ण रक्कम काढून घेण्यात आली. शेतकरी केवळ बळीचा बकरा ठरले, तर खऱ्या सूत्रधारांनी कोट्यावधी रुपये हडपले.

ग्यानेंद्र रामसुत चतुर्वेदी (वय ३७, स्टेट हेड, महाराष्ट्र व मध्य प्रदेश) यांनी नांदगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत सांगितले की, त्यांची कंपनी व्हील लॉजिस्टिक्स एचडीएफसी बँकेकडून गोदामातील मालाची तपासणी, व्यवस्थापन आणि कस्टडी देते. कंपनी १० जुलै २०१३ पासून एचडीएफसी बँकेसोबत काम करत आहे. नांदगाव येथील दहेगाव रोडवरील गोडाऊन नंबर ७६ मध्ये ११ महिन्यांसाठी (१६ ऑक्टोबर २०२५ पासून) कापूस गाठी ठेवण्यात आल्या. अशोक सदाशिव राऊत (लक्ष्मी व्यंकटेश ट्रेडर्स, तांदुळवाडी तालुका गंगापूर), शिवनारायण मालपाणी (शिवा ट्रेडर्स, गंगापूर) आणि इतरांनी मिळून या गोडाऊनमध्ये माल ठेवल्याचे दाखवले.

कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी (रोशन गोनाडे - हब व्यवस्थापक, अरबाज खान - क्लस्टर कंट्रोलर व्यवस्थापक, सिद्धार्थ अमराव - कंट्रोलर व्यवस्थापक) गोडाऊनची बोगस तपासणी केली गाठी चांगल्या असल्याचे दाखवले. मात्र तपासणीत ९०% कापूस गाठी खराब असल्याचे स्पष्ट झाले. तरीही त्यांनी मूल्यांकन साडेसहा कोटी ५९ लाख रुपयांचे दाखवले.

या आधारावर एचडीएफसी बँकेने अशोक राऊत आणि शिवनारायण मालपाणी यांना पाच कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले. संतोष जाधव याच्या सल्ल्याने महांकाळ वडगाव येथील माजी सरपंच कचरू महांकाळे यांच्या कृषी उद्योगाच्या माध्यमातून तेथील १८ शेतकऱ्यांच्या नावे ते पैसे ट्रान्सफर केले. त्यांचा विश्वास संपादन करून ते पैसे घोटाळेखोरांनी पुन्हा काढून घेतले. शेतकऱ्यांच्या बँक खात्याचा फक्त पैसे फिरवण्यासाठी वापर केला.

५ डिसेंबर २०२५ रोजी बँकेच्या ऑडिटर सतीश चांडक यांनी गोडाऊनला भेट दिली. त्यानंतर ६ डिसेंबर २०२५ रोजी तक्रारकर्त्यांना गोदामात बोलावण्यात आले. तेथे खराब माल दिसून आला. जेव्हा याबाबत प्रश्न विचारला, तेव्हा आरोपींनी फोन बंद केले आणि संपर्क तोडला. या घोटाळ्यातील धक्कादायक बाब म्हणजे शेतकऱ्यांचा व त्यांच्या बँक खात्यांचा गैरवापर. गुन्ह्याच्या सूत्रधारांनी श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळ वाडगाव येथील शेतकऱ्यांच्या नावाने/खात्यात कर्ज वर्ग केले. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन किंवा दबावाखाली त्यांच्याकडून पूर्ण रक्कम काढून घेतली. शेतकरी केवळ नावासाठी वापरले गेले. (पान ४ वर)



### सूत्रधार संतोष जाधव फरार

या प्रकरणी नाशिक आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने त्वरित हालचाल केली. टोळीतील मुख्य आरोपींना बेड्या ठोकल्या. मात्र टोळीचा सूत्रधार संतोष पाटील उर्फ संतोष जाधव अद्याप फरार आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत. संतोष जाधव याच्यावर यापूर्वी देखील बोगस आर्थिक व्यवहाराचे आरोप आहेत. त्याचा साथीदार माजी सरपंच कचरू महांकाळे याला पोलिसांनी अटक केली आहे.

### आधी जिल्हा बदनाम केला...

श्रीरामपूर, संगमनेर, वैजापूर आदी भागांमध्ये अशीच कोट्यावधींची फसवणूक यापूर्वीही झाल्याचा पोलिसांना संशय आहे. बोगस गाठी गोडाऊन मध्ये ठेवून त्याचा कोट्यावधींचा विमा उतरवायचा, व नंतर हे गोडाऊन पेटवून द्यायचे असा हा फंडा. यात एका मोठ्या पतसंस्थेचा सूत्रधार देखील सहभागी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात हा फंडा सर्वश्रुत झाल्याने आता या टोळीने आजूबाजूच्या जिल्ह्याकडे मोर्चा वळवल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

### फसवणुकीची रक्कम

**गोडाऊनमधील कापूस गाठींचे दाखवलेले मूल्य : सुमारे ६ कोटी ५९ लाख रुपये**

**बँकेकडून मंजूर झालेले कर्ज : ५ कोटी रुपये**

**खरा माल : खराब/निकृष्ट दर्जाचा, ५० ते ९० टक्के अपात्र**

# 'साकळाई'ला मंत्रीमंडळाची मान्यता, विखेंच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेस अखेर मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली.


१ एप्रिलला झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या योजनेस मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात वर्षांपूर्वी दिलेला शब्द यानिमित्ताने पूर्ण केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी या कामासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला बुधवारी यश मिळाले. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांवेळीही डॉ. विखे पाटील यांनी साकळाईबाबत शब्द दिला होता. तोच शब्द, आता पूर्ण झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर तालुका व श्रीगोंदा तालुक्यातील ३२ दुष्काळी गावांसाठीच्या साकळाई योजनेची चर्चा गेल्या अनेक पिढ्यांपासून सुरु होती. या योजनेतून या दोन्ही तालुक्यातील ९,६०० हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याचे नियोजन होते. या योजनेच्या नावाखाली अनेक निवडणूका लढविल्या गेल्या. परंतु प्रत्यक्षात ही योजना पूर्ण झाली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १६ एप्रिल २०१९ ला वाळकी येथे झालेल्या जाहीर सभेत साकळाई योजनेला मंजूरी (पान ४ वर)

**बोले तैसा चाले...**

**साकळाई उपसा सिंचन योजनेअंतर्गत म्हैसगाव येथून ४ टप्प्यांत पाणी उचलून ते श्रीगोंदा व नगर तालुक्यातील ३२ गावांना दिले जाणार आहे. त्यातून लघू पाझर तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे, गाव तळे भरुन घेतली जाणार आहेत. या योजनेसाठी १.६० टिएमसी पाणी सिंचनासाठी व ०.२० टीएमसी पाणी हे पिण्यासाठी देण्याचे नियोजन आहे.**



## महत्वाचे..



### साई संस्थान कर्मचारी मृत्यू मागे खरात?

शिर्डी : साई संस्थान कर्मचारी विकास रामदास दिवटे आत्महत्या प्रकरणात आता सर्वात धक्कादायक वळण समोर आले आहे.

गेल्या चार वर्षांपूर्वी आत्महत्या केलेला संस्थान कर्मचारी दिवटे याने लिहून ठेवलेल्या सुसाईड नोटमध्ये कॅप्टन अशोक खरात याचे नाव लिहून ठेवले होते.

आत्महत्येस प्रवृत केलेल्या सुसाईड नोट मधील खरातचे नाव काढून त्या गुन्हयात त्याला पद्धतशीरपणे गुन्हातून वगळले.

मयत व्यक्तीवर मानसिक दबाव, धमक्या आणि त्रास दिल्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा संशय स्पष्टपणे व्यक्त करण्यात आला होता.

खरातचे नाव आता आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या यादीत आल्याने कॅप्टन खरातची वरात लवकरच शिर्डीच्या दारात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी सांगितले.

# भरधाव ट्रकची धडक; समृद्धी महामार्गावर ६ महिला मजुरांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** जालना तालुक्यातील कडवंची शिवारात समृद्धी महामार्गवर अत्यंत भीषण अपघात झाला. यात सहा महिला मजुरांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने महामार्गावर काम करणाऱ्या महिला मजुरांना चिरडल्याने हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाणारा ट्रक नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला काम करत असलेल्या महिला मजुरांवर आदळला. ट्रकचा वेग प्रचंड असल्यामुळे महिलांना सावरायलाही वेळ मिळाला नाही. या अपघातात सहा महिला मजूर ट्रकच्या चाकाखाली चिरडल्या जाऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की मृतदेहांचा चेंदामेंदा झाला असून घटनास्थळी रक्ताचा सडा पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.





घटनेची माहिती मिळताच जालना तालुका पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतले असून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. तसेच ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील कामगारांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित विभागाने सुरक्षा उपाययोजना अधिक कडक करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पोटनिवडणुकीत वारसांना संधी

## राहुरीत अक्षय कर्डिले; बारामतीत सुनेत्रा पवारांना उमेदवारी





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राज्यात दोन रिक्त विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी राजकीय पट सज्ज झाला आहे. सत्ताधारी पक्षाने आपले उमेदवार निश्चित केले आहेत. भाजपाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी जागेसाठी अक्षय कार्डिले यांना उमेदवारी दिली आहे. भाजपाचे आमदार शिवाजी कार्डिले यांच्या अकाली निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. अक्षय कार्डिले हे दिवंगत शिवाजी कार्डिले यांचे सुपुत्र आहेत.

दरम्यान, राज्यातील सर्वात महत्त्वाच्या जागांपैकी एक असलेल्या (पान ४ वर)

### 'राष्ट्र सह्याद्री'चा अंदाज खरा ठरला



राष्ट्र सह्याद्री

E-pepar - 22 Mar 2026 - Page 8

...आणि प्राजक्त तनपुरे यांना मुख्यमंत्री फडणवीसांचा फोन?

युवा नेते अक्षय कर्डिले यांची उमेदवारी निश्चित असल्याचे 'राष्ट्र सह्याद्री'ने दहा दिवसांपूर्वीच २२ मार्च रोजी प्रसिद्ध केले होते. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याशी संपर्क साधून समन्वय साधण्याचा प्रयत्न देखील केला. मात्र तसे न होता तनपुरे यांनी उमेदवारी लढवण्याचे ठरवले आहे. तनपुरे व कर्डिले यांच्यातील ही लढत रंगतदार होण्याचे स्पष्ट संकेत महाराष्ट्र सह्याद्रीच्या बातमीतून देण्यात आले होते. आज तो अंदाज तंतोतंत खरा ठरत असल्याचे वाचकांनी दूरध्वनीद्वारे राष्ट्र सह्याद्री कार्यालयाशी संपर्क साधून सांगताना विश्वासार्ह बातमीदारीबद्दल समूहाचे अभिनंदन केले...

### प्राजक्त तनपुरे अपक्ष लढणार..?

जनतेचा कौल घेण्यासाठी तालुक्यात संपर्क दौरा केलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना उमेदवारी देण्यासाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तयारी दाखवली असली तरी तनपुरे आणि त्यांच्या समर्थकांची मात्र अपक्ष लढण्याची तयारी पूर्ण झाल्याची चर्चा अहिल्यानगर जिल्ह्यात आहे. त्यामुळे प्रारंभी बिनविरोधाची चर्चा सुरू होती मात्र आता ही पोटनिवडणूक रंगतदार होणार असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत.



# महाराष्ट्र–पंजाबमध्ये दुग्धउत्पादनासाठी सामंजस्य करार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** तालुक्यात विकसित झालेला दुग्धव्यवसायाचा आदर्श मॉडेल आता राज्याच्या पलीकडे झेपावला असून महाराष्ट्र व पंजाब राज्यांदरम्यान दुग्धउत्पादन क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमामुळे 'संगमनेर पॅटर्न' राज्यासाठी दिशादर्शक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

वसंत लॉन्स येथे संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीने आयोजित 'मिशन ५० लिटर दुग्ध क्रांती' कार्यशाळेत महाराष्ट्र प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर्स असोसिएशनचे अध्यक्ष रणजीतसिंह देशमुख आणि पंजाब प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर्स असोसिएशनचे अध्यक्ष दलजीतसिंग गिल यांच्यात करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी मोठ्या संख्येने युवक दूध उत्पादक, महिला व तज्ञ उपस्थित होते. 'मिशन ५० लिटर' या उपक्रमांतर्गत कमी गाईंमध्ये अधिक दूध उत्पादनावर भर देण्यात येत आहे.

यासाठी २५ पशुवैद्यकीय तज्ञांना प्रत्येकी १० शेतकरी व १० गाईंची जबाबदारी देण्यात आली असून सुमारे २५० गाईंच्या आरोग्य व आहारावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. पुढील दोन वर्षांत ५० लिटर दूध देणाऱ्या गाई विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या करारामुळे महाराष्ट्र व पंजाबमधील शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, आहार व्यवस्थापन व गोठा पद्धती यांची देवाणघेवाण होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना परस्परांच्या प्रगत डेअरी प्रकल्पांना भेट देण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात यांनी दूध व्यवसायामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळाल्याचे सांगून 'मिशन ५० लिटर' ही चळवळ म्हणून राबवण्याचे आवाहन केले. तर दलजीतसिंग गिल यांनी संगमनेरचा दुग्धउत्पादन पॅटर्न राज्यासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

### 'संगमनेर पॅटर्न' राज्यासाठी दिशादर्शक




**संगमनेर तालुक्यात दररोज सुमारे चार लाख लिटर दूध संकलन होत असून एकूण उत्पादन नऊ लाख लिटरपर्यंत पोहोचले आहे. यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आर्थिक समृद्धी निर्माण झाली आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारांवर उभ्या राहिलेल्या सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना चांगला दर देत दुग्धव्यवसायाला बळ दिले आहे.**

## संपादकीय

# 'शिक्षणा'च्या उंबरठ्यावर खुंटलेला सामाजिक विवेक!

अहिल्यानगर तालुक्यातील नवनागापूर येथील ऋतुजा राजळे या २५ वर्षीय विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून आपली जीवनयात्रा संपवली. ही केवळ एक आत्महत्या नाही, तर आपल्या प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या समाजव्यवस्थेने केलेला एक 'संस्थात्मक खून' आहे. लग्नाला वर्षही पूर्ण झाले नसताना, केवळ 'संतानप्राप्ती' होत नाही या कारणावरून एका उच्चशिक्षित तरुणीला मरण पत्करावे लागते, ही घटना महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी मान खाली घालायला लावणारी आहे. ऋतुजाची सुसाईड नोट आणि तिने वडिलांकडे व्यक्त केलेली हतबलता, आजच्या २१ व्या शतकातील स्त्रीच्या सुरक्षिततेच्या दाव्यावर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते.

।भारतीय समाजव्यवस्थेत महिलांचा छळ ही अनादी काळापासून चालत आलेली एक अनिष्ट प्रथा आहे. काळ बदलला, तसे राहणीमान बदलले, तंत्रज्ञान आले आणि शिक्षणाचे प्रमाणही वाढले. एकेकाळी असे मानले जात होते की, समाज सुशिक्षित झाला की महिलांवरील अत्याचार कमी होतील. मात्र, वास्तवात चित्र नेमके उलट दिसत आहे. शिक्षणाने माणसाचा मेंदू विकसित केला असेल, पण मन आणि विवेक मात्र आजही सनातनी मानसिकतेच्या साखळदंडांनी जखडलेला आहे. ज्या घरांमध्ये पदव्यांच्या भिंती सजवलेल्या आहेत, त्याच घरांच्या चार भिंतींच्या आड आजही ''तुला मूल का होत नाही?'' किंवा ''हुंडा कमी का आणला?'' असे अश्मयुगीन प्रश्न विचारून विवाहितांचा मानसिक छळ केला जातो.

गेल्या पाच वर्षांतील महाराष्ट्रातील महिलांवरील अत्याचाराची, विशेषतः कौटुंबिक हिंसेची ( आयपीसी ४९८-अ) आकडेवारी पाहिली तर अंगावर काटा येतो. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या अहवालानुसार, महाराष्ट्रात दरवर्षी कौटुंबिक हिंसेच्या प्रकरणांमध्ये सरासरी १० ते १५ टक्क्यांनी वाढ होताना दिसत आहे. या आकडेवारीनुसार २०१९ मध्ये ७७१५ कौटुंबिक खेळाची प्रकरणी नोंदवली गेली. २०२० मध्ये ८५४७, २०२१ मध्ये दहा हजार ३५१, २०२२ मध्ये साडेअकरा हजार तर २०२३ २४ मध्ये अंदाजे १२ हजारांहून अधिक कौटुंबिक खेळाचे प्रकरणे नोंदवली गेली आहेत. ही आकडेवारी केवळ पोलीस ठाण्यांपर्यंत पोहोचलेल्या प्रकरणांची आहे. ''घराची अब्रू घराबाहेर जाऊ नये'' या भीतीने दाबल्या गेलेल्या तक्रारींची संख्या यापेक्षा कितीतरी पटीने जास्त असू शकते. आश्चर्याची बाब म्हणजे, यात आरोपी असणारे सासरचे लोक हे बहुतांशी सुशिक्षित आणि नोकरी-व्यवसाय करणारे आहेत. याचाच अर्थ, शिक्षणामुळे आपली आर्थिक स्थिती सुधारली असली, तरी कौटुंबिक नात्यांमधील संवेदनशीलता मात्र कमालीची आटली आहे.

ऋतुजाच्या प्रकरणात तिला विचारलेले प्रश्न - ''तुला पाळी येते का?'' किंवा ''तू गर्भवती का राहत नाहीस?'' - हे केवळ अपमानकारक नाहीत, तर ते सासरच्या लोकांच्या अज्ञानाचे प्रदर्शन आहेत. वैद्यकीय विज्ञानानुसार, वंध्यत्वाची अनेक कारणे असू शकतात आणि त्यासाठी स्त्री व पुरुष दोघेही कारणीभूत असू शकतात. मात्र, आपल्या समाजात दोषारोपाचे सर्व खापर केवळ स्त्रीवरच फोडले जाते. लग्नानंतर अवघ्या काही महिन्यांतच बाळ हवेच, हा आग्रह धरणारे सासरचे लोक त्या विवाहितेच्या मानसिक आरोग्याचा विचार करायला तयार नसतात.

ऋतुजाने मृत्यूपूर्वी वडिलांना सांगितले होते, ''माझी सहनशक्ती संपली आहे.'' हा एक शब्द आज महाराष्ट्रातील हजारो विवाहितांच्या मनातील आर्जव आहे. ४९८-अ सारखा कठोर कायदा असूनही महिला आत्महत्या का करत आहेत? कारण, जेव्हा एखादी महिला पोलिसांत तक्रार करायला निघते, तेव्हा समाज आणि कधीकधी स्वतःचे माहेरही तिला ''जुळवून घेण्याचा'' सल्ला देतात. कायदेशीर प्रकिया दीर्घकाळ चालणारी असते आणि त्या काळात मिळणारी सामाजिक वागणूक अधिक क्लेशदायक असते. ऋतुजाच्या प्रकरणात सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे, पण तिला गेलेला प्राण परत मिळणार नाही.

केवळ गुन्हे दाखल करून किंवा कायदे कडक करून हा प्रश्न सुटणार नाही. स्त्रीला 'वंश वाढवण्याचे यंत्र' म्हणून पाहण्याची दृष्टी बदलणे आवश्यक आहे. लग्नापूर्वी केवळ कुंडली न जुळवता, मुला-मुलीचे आणि त्यांच्या पालकांचे मानसिक समुपदेशन होणे काळाची गरज आहे. लग्नात किती हुंडा दिला, यापेक्षा मुलीला सासरी किती आदराची वागणूक मिळते, स्त्री धनापेक्षा स्त्री सन्मान मिळतो का? यावर पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. केवळ पदवी देणे पुरेसे नाही, तर संकटाच्या वेळी सासरची पायरी ओलांडून स्वतः च्या पायावर उभे राहण्याचे धाडस मुलींमध्ये निर्माण केले पाहिजे, तरच काहीसा बदल झालेला जाणवेल.अहिल्यानगरमधील ऋतुजाची आत्महत्या ही संपूर्ण समाजासाठी एक 'अलार्म' आहे. जर आपण शिक्षणासोबत संस्कार आणि संवेदनशीलता जपू शकलो नाही, तर अशा घटनांचे सत्र थांबणार नाही. सासरच्या छळाविरुद्ध केवळ तक्रारींचे आकडे वाढणे हे सुदृढ समाजाचे लक्षण नाही. जेव्हा सासरची माणसे सुनेला स्वतःची मुलगी मानू लागतील आणि तिची शारीरिक-मानसिक अवस्था समजून घेतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज सुशिक्षित झाला असे म्हणता येईल. तोपर्यंत ऋतुजासारखे अनेक बळी या व्यवस्थेच्या आहुती पडत राहतील. आता समाजाने आपल्या मनातील 'दोषी' विचार बाजूला सारून स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहण्यास शिकण्याची वेळ आली आहे...

# श्रम संहितांच्या अंमलबजावणीविरोधात कामगारांचा 'काळा दिवस' निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रम संहिता लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाच्या विरोधात मुळा कारखाना परिसरात कामगारांनी बुधवारी 'काळा दिवस' पाळत तीव्र निषेध नोंदविला. राष्ट्रीय साखर कामगार युनियनच्या वतीने कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर कामगार एकत्र येऊन काळ्या फिती लावून आंदोलन केले.




यावेळी युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार, सरचिटणीस डी. एम. निमसे, उपाध्यक्ष कारभारी लोडे, खजिनदार सुभाष सोनवणे, सहचिटणीस भारत पटारे, कामगार संचालक विश्वास डेरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आले.

कामगार नेत्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करत नव्या श्रम कायद्यांमुळे कामगारांचे हक्क कमी होण्याची भीती व्यक्त केली. नोकरीची सुरक्षितता घटेल व कंपन्यांना कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळेल, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

देशभरातील विविध कामगार संघटनांनीही या निर्णयाविरोधात निषेध व्यक्त केला असून यापूर्वी 'भारत बंद'चे आवाहन करण्यात आले होते. आंदोलनाच्या शेवटी कामगार एकजुटीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत करा : अब्दूल शेख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिकांचे पंचनामे करून तातडीची मदत करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अब्दूल शेख यांनी केली आहे.



नेवासा तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक ठिकाणी उभे पीक, फळबागा तसेच साठवलेला शेतीमाल पूर्णपणे बाधित झाला आहे.अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून गंभीर आर्थिक अडचणीत सापडला आहे.

तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश संबंधित प्रशासनाला द्यावेत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी अशी मागणी शेख यांनी शासनाकडे केली आहे.

# गौतम सहकारी बँकेची नेत्रदीपक कामगिरी; ४.१४ कोटींचा नफा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** सहकार क्षेत्रातील अग्रगण्य गौतम सहकारी बँक ने २०२५-२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत ४१४.०६ लाख रुपयांचा ढोबळ नफा मिळवला असून सर्व तरतुदीनंतर १३५.४८ लाखांचा निव्वळ नफा नोंदविला आहे. ही माहिती बँकेचे चेअरमन संजय आगवन, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे व प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमूड यांनी दिली. बँकेच्या आर्थिक ताळेबंदानुसार निव्वळ नफ्यात १५ टक्के वाढ झाली असून स्थूल नफ्यात तब्बल ७४ टक्क्यांची भर पडली आहे. ठेवीदारांचा वाढता विश्वास लक्षात घेता बँकेकडे १४८.५० कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या असून चालू वर्षात ८९.५५ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. बँकेची गुंतवणूक ७७०४.२७ लाख रुपये असून सीआरएआर १९.३८ टक्के व पीसीआर २१६.७३ टक्के आहे. विशेष म्हणजे बँकेने सलग दुसऱ्या-तिसऱ्या वर्षी नेट एनपीए शून्यावर राखत ग्रॉस एनपीए ४.४२ टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने ही प्रगती साधली असून आगामी काळात आधुनिक तंत्रज्ञान व उत्कृष्ट ग्राहक सेवेच्या बळावर अधिक प्रगती करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.




# जेऊर हैबती येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील जेऊर हैबती येथील पावन हनुमान मंदिर देवस्थान येथे पावन हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. वै. ह.भ.प. शिवराम महाराज रिंधे, वै.ह.भ.प. गुरुवर्य बन्सी महाराज तांबे (श्री क्षेत्र नेवासा), वै. यादव महाराज म्हस्के, वै. ह.भ.प. रामभाऊ महाराज रिंधे यांच्या कृपाशीर्वादाने, अण्णासाहेब (आबा) मारुतराव म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली व समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ यांच्या सहकार्याने या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे ध्वजपूजन गुरुवारी (दि.२) सकाळी ८.३० वाजता महंत गुरुवर्य ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज, स्वामी प्रकाशनंदगिरीजी महाराज, वेदांतचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के (श्री ज्ञानेश्वर रचना स्थान, श्री क्षेत्र नेवासा) यांच्या हस्ते होणार आहे. गुरुवारी ९ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप (संगमेश्वर देवस्थान, सांगवी, आष्टी) यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ व



भजनी मंडळ जेऊर हैबती यांनी केले आहे.

# महायुतीच्या शास्ती माफीच्या निर्णयामुळे कर वसुलीला प्रतिसाद : सूर्यवंशी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** राज्यातील महायुती सरकारने ५० टक्के शास्ती माफीसाठी महत्वपूर्ण ऐतिहासिक 'अभय योजना' लागू केली. यासाठी आ. अमोल खताळ यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आणि शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. या पाठपुराव्यामुळेच शहरातील नागरीकांना मोठा फायदा होत आहे. तसेच संगमनेर नगरपालिकेला कर वसुलीच्या माध्यमातून शहर विकासासाठी मोठा निधी उपलब्ध होत आहे. पालिका प्रशासनाकडून या निधीचा उपयोग पायाभूत सुविधांसाठी करण्यात यावा अशी अपेक्षा शिवसेना नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

अर्थिक वर्ष अखेरीस कर वसुलीसाठी नागरीकांनी केलेले सहकार्य विचारात घेता महायुती सरकाने घेतलेल्या शास्ती माफीचा सकारात्मक परिणाम असल्याचे सांगून नगरसेविका सूर्यवंशी म्हणाल्या, आ. अमोल खताळ यांनी नागरीकांना शास्ती माफीचा लाभ मिळावा म्हणून राज्य



सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची व्यक्तिगत भेट देवून शास्ती माफीचा निर्णय लागू व्हावा म्हणून विशेष प्रयत्न केले. यामुळे वर्षानुवर्ष नागरीकांवर असलेला कराचा बोजा कमी झाला. पालिका प्रशासनाला वसुलीस नागरिकांनी मोठे सहकार्य केल्याचे नगरसेविका सूर्यवंशी यांनी सांगितले.

पालिकेच्या तिजोरीत कराच्या रूपाने जमा झालेला निधी विकास कामासाठी असून पालिका प्रशासनाने यामाध्यामतून शहरातील पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्याची मागणी सूर्यवंशी यांनी केली आहे.

# अमृतवाहिनी बी फार्मसीच्या ४६ विद्यार्थ्यांची जेनेव्हा बायोफार्मासिटिकलमध्ये निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या अमृतवाहिनी शिक्षण संस्थेतील अमृतवाहिनी बी. फार्मसी मधील ४६ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा पूर्वीच जेनोव्हा बायोफार्मासिटिकल लिमिटेड, पुणे या नामांकित कंपनीमध्ये चांगल्या पॅकेजवर निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ एम जे चव्हाण यांनी दिली आहे.




विद्यार्थ्यांच्या झालेल्या प्लेसमेंट बाबत अधिक माहिती देताना प्राचार्य डॉ चव्हाण म्हणाले की, अमृतवाहिनी बी फार्मसी , अमृतवाहिनी शिक्षण संस्था यांचा विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर सामंजस्य करार आहे. मेडिकल विभागातील १३ आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सामंजस्य करार असल्याने विविध कंपन्या महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांच्या कॅम्पस इंटरव्यू घेत आहेत.

संस्थेमध्ये स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून त्या अंतर्गत विविध चर्चासत्रे, कार्यशाळा याचबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त कंपनीतील कार्यक्षेली बाबत माहिती दिली जात आहे. तसेच कंपन्यांशी भेट घडून आणली जात असून यामधून विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव दिला जात आहे.जेनोव्हा बायोफार्मासिटिकल लिमिटेड पुणे या कंपनीचे एचआर मॅनेजर निलेश खैरे आणि संपत आवरे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखत घेतल्या त्यापैकी ४६ विद्यार्थ्यांची चांगल्या पॅकेजवर निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांच्या नोकरी कमी प्लेसमेंट अधिकारी डॉ दिनेश हासे, डॉ सचिन गुंजाळ, प्रा. रेश्मा शेळके, माजी विद्यार्थी समन्वयक डॉ संकेत काळमेघ यांनी विशेष प्रयत्न केले.

# प्रहार दिव्यांग संस्थेच्या अध्यक्षा तब्बू थेरकर यांचा सन्मान

**नेवासा :** तालुक्यात दिव्यांग महिलांसाठी तन मन धनाने समर्पक वृत्तीने कार्य करणाऱ्या प्रहार दिव्यांग संस्थेच्या नेवासा तालुका अध्यक्षा तब्बूदिदी थेरकर यांचा त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रहारचे संस्थापक व लढवय्ये नेते माजी मंत्री बच्चू कडू यांच्या हस्ते प्रहार दिव्यांग जनजागृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रहार दिव्यांग संस्थेच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या तब्बू थेरकर यांनी शालेय मुलींना शैक्षणिक साहीत्य वाटप, अन्नदान करणे,महिलांचे विविध प्रश्न प्रहार जनशक्ती पक्षाकडे मांडून ते सोडविण्यासाठी तळमळीने प्रयत्न केला आहे.

दिव्यांगांना न्याय देणाऱ्या तब्बू थेरकर यांनी प्रहार दिव्यांग जनजागृती पुरस्कार बच्चू कडू यांच्या हस्ते अहिल्यानगर येथे झालेल्या कार्यक्रमात नुकताच प्रदान करण्यात आला.

प्रहार दिव्यांग संस्थेच्या अध्यक्षा या नात्याने नेवासा तालुक्यातील दिव्यांग महिला व मुलींसाठी आपण शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहू त्यांच्या न्याय हक्कांसाठी लढत राहू असा निर्धार प्रहार दिव्यांग संस्थेच्या महिला विभागाच्या अध्यक्षा तब्बू थेरकर यांनी यावेळी बोलतांना केला.

# टाकळीभान येथे यात्रा उत्सव निमित्त महादेव यात्रा कमिटीची बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानसह पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे आराध्य दैवत असणार्या शंभू महादेवाच्या यात्रौत्सवाच्या वर्गणीचा शुभारंभ सोमवार दि.३० मार्च रोजी महादेवास नारळ अर्पण करून करण्यात आला. यावेळी यात्रा कमिटी व ग्रामस्थांची छोटेखाणी बैठक पार पडली. यामध्ये जास्तीत जास्त वर्गणी ग्रामस्थांनी जमा करून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.



सालाबादप्रमाणे या वर्षीही टाकळीभानसह पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे आराध्य दैवत असणार्या शंभू महादेवाचा यात्रौत्सव दि.२० व २१ रोजी पार पडणार आहे. बहारदार ऑर्केस्टा, लोकनाट्य तमाशा, कुस्त्यांचा हगामा आदीसह इतर भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन या यात्रौत्सवात केले जाते. मोठ्या संख्येने भाविक भक्त तसेच पैपाहुणे यात्रौत्सवास हजेरी लावत असल्याने यात्रेचे स्वरूप दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्याच अनूषंगाने यात्रौत्सव मोठ्या दिमाखात व शांततेत पार पडावा या अनूषंगाने सोमवार दि. ३० मार्च रोजी सकाळी ९ वा. महादेव मंदीराच्या प्रांगणात ग्रामस्थ व यात्रा कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शंभू महादेवाला नारळ अर्पण करून वर्गणीस प्रारंभ करण्यात आला. ग्रामस्थांनी सढळ हाताने जास्तीत जास्त वर्गणी देवून यात्रा कमिटीस सहकार्य करावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी राजेंद्र कोकणे, मंजाबापू थोरात, गजानन कोकणे, बापूसाहेब शिंदे, शिवाजीराव शिंदे, श्रीधर गाडे,लक्ष्मण सटाले, दत्तात्रय नाईक, प्रा.जयकर मगर, भाऊसाहेब पटारे, पत्रकार चंद्रकांत लांडगे, संदीप बोडखे, पाराजी पटारे, अमोल पटारे, विशाल पटारे, काकासाहेब डिके, अनिल बोडखे, सुनिल बोडखे, भाऊराव कोकणे, सुरेश पवार, मधूकर गायकवाड, आबासाहेब रणनवरे, अनिल कोकणे, नितिन पटारे, रंगनाथ कोकणे, बंडोपंत बोडखे, रोहीदास पटारे, प्रा.कार्लस साठे, बबनराव मगर, बाबासाहेब तनपुरे, संजय रणनवरे, रत्नाकर रणनवरे, बाबा पांडे, गोरख कोकणे, कृष्णा वेताळ, बंडू वेताळ, दत्तात्रय मगर, खंडेराव गवांदे, राजेंद्र देवळालकर आदीसह सर्वपक्षीय नेते, ग्रामस्थ भाविक भक्त यात्रा कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# 'खरातास द्यावी फाशी, सहकाऱ्यांची करावी काशी'

**प्रति,**
**माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,**
**महाराष्ट्र राज्य,**
**रा.न.वि.वि. डॉ. वंदना ज्ञानेश्वर गुरफुरे**
**३१/०३/२६**
**श्रीरामपूर, अहिल्यानगर**

महोदय,

आपण 'खरातचे प्रकरण' बाहेर काढले, त्याबद्दल आपला अभिमान वाटला. पण थोडी नाही, बहुत खंतही आहे. ती खंत आपणासोबत पत्रप्रपंचाने मांडत आहे.

आजपर्यंत महाठगाच्या बातम्यांनी वर्तमानपत्राचे पहिले पान सोडले नाही. भोंदूबाबाचे कारनामे प्रसिद्ध होणे गरजेचे आहे, ज्यामुळे समाजाला समज येईल. खरातासोबत असणारे समाजप्रतिनिधींचे विंग फुटले आहे. पडद्यापुढील व मागील कलाकार सवंग लोकप्रियतेच्या गर्तेत सापडत आहेत. सर्वसामान्या नागरिकांनी सतर्कता बाळगली पाहिजे, हे आता सर्वांच्या लक्षात येत आहे.

मा. मुख्यमंत्री साहेब, आपल्या आदेशाने हे प्रकरण कुणाचाही लवाजमा किंवा दबाव न बाळगता बाहेर आले, तेव्हा आपल्या कार्याचा अभिमान वाटला. या पुरोगामी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याला साजेसेच आपण वागलात. प्रसिद्धीमाध्यमे खराताच्या पापाचा पाढा वाचत होती.

परंतू साहेब, मला तुमच्याबद्दल असलेला अभिमान गळून पडला जेव्हा विधानभवनात अध्यक्ष-सदस्यांसमोर आपण खराताच्या पापाची उजळणी सांगत असताना, महिला आमदारांसमोर आपणाला वाचण्याला शोभू नये असे 'ते' वाक्य आपल्या वकिली खाक्यात वाचून दाखवत होतात. टीव्हीवरील प्रक्षेपणात पाहताना असे वाटले की, आपण 'ते' वाक्य टाळू शकला असता.

वर्तमानपत्रात आणि न्यूज चॅनलवर खराताच्या पापाची पारायणे सुरू आहेत. एका न्यूज चॅनल प्रतिनिधीने खाजगीत मत व्यक्त केले की, ''आम्हाला वरून ऑर्डर आहे, खरातच्या गावाला जा, नवीन ब्रेकिंग न्यूज आणा, आमच्यावर प्रेशर आहे''. न्यूज चॅनल त्यांच्या टीआरपी साठी काहीही करणार, हे सुज्ञास सांगणे न लगे.

पण सोशल मीडियाचे काय? फेसबुकवर त्या नराधम खराताच्या ऑफिसमधील स्काईप कॅमेऱ्याचे फुटेज सतत व्हायरल होत आहेत. त्या खराताने नालायकपणाची हद्द तर पार केलीच आहे, पण त्याचे ते पाप समाजाने का पाहायचे? युट्युब, फेसबुक, इंस्टाग्रामवर जेवढे व्ह्यूज वाढतील तेवढे पैसे मिळतात म्हणून काय समाजबिघडवणारे व्हिडिओ टाकायचे का?

सोशल मीडियावर सर्व वयोगटातील नागरिक, मुले-मुली आहेत. हीच पिढी उद्याची सुज्ञ नागरिक होणार आहे. यांच्यावर 'एक टेबल अनेक महिला' या व्हिडिओचा काय परिणाम होईल, याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे. पिढीचा मध्यमवयीन स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. कोवळ्या वयातील मुलींच्या सुप्त मनात हे व्हिडिओ गेल्यास त्या भविष्यात निडर होऊ शकतात. कोणत्याही गोष्टीची वारंवारता त्याची दाहकता कमी करते.


मा. मुख्यमंत्री साहेब, तो लफंगेबाज महिलांना उत्तेजक औषधे पाजायचा. अनेक महिला कळत-नकळत याची शिकार झाल्या आहेत. काही महिला व्हिडिओच्या भीतीमुळे पुढे येत नसतील. त्यामुळे नवीन गुन्हे दाखल व्हायचे राहून जातील. या महिलांच्या नालायकपणाचे कारनामे त्यांच्या कुटुंबियांना, म्हाताऱ्या आई-वडिलांना किंवा मुलांना माहिती नसतील. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर समाजात त्या स्त्रियांचे जगणे दुरापास्त होईल आणि कुटुंबे उद्धस्त होतील. यामुळे आत्महत्येशिवाय महिलांना पर्याय उरणार नाही.

हिंदू धर्मात 'चारित्र्यसंपन्नता' हा मानबिंदू आहे. या डागामुळे आपला धर्म जगाच्या पाठीवर बदनाम होत आहे. हे व्हिडिओ जगभरातून पाहणारे लोक महाराष्ट्राच्या आणि भारतीय संस्कृतीबद्दल काय म्हणत असतील?

२६/११ च्या हल्ल्याचे थेट प्रक्षेपण दहशतवाद्यांना मदत करत होते, तेव्हा परदेशातून फोन आल्यावर लाईव्ह थांबवले गेले होते. तसाच एखादा फोन कॉल परक्यांकडून आल्यावरच आपण या व्हिडिओंवर बंदी घालणार का?

खरातला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे आणि महिलांवर अत्याचार करणाऱ्याला शिक्षा मिळायलाच हवी. माझ्या दृष्टीने खरे गुन्हेगार तर ते पुरुष आहेत ज्यांना हे सर्व माहित असूनही त्यांनी विरोध केला नाही. खरातची केस 'इन कॅमेरा' चालली पाहिजे. कोवळ्या मनाला या दृश्यांपासून दूर ठेवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. तरी मुख्यमंत्री साहेब, महाराष्ट्रातील पुरोगामित्व गंजू देऊ नका. धर्मरक्षक नको, समाजरक्षक निर्माण करावा, हीच कळकळीची अपेक्षा.

**लोभ असावा...**



**डॉ. वंदनाताई ज्ञानेश्वर मुरकुटे.**
**महासचिव:**
**महाराष्ट्र राज्य महिला काँग्रेस**
**श्रीरामपूर**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द • ख • ल

## प्लॅस्टिक व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**पोहेगाव** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत कोपरगाव पंचायत समिती व गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय प्लॅस्टिक पुनर्वापर व व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात पार पडली. तालुक्यातील सरपंच, प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी व शालेय मुख्याध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले. के. जे. सोमैय्या महाविद्यालयात आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन ट्रस्टी संदीप रोहमारे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी संदीप दळवी होते. पुणे येथील जलबिरादरी संस्थेचे विनोद बोधनकर यांनी प्लॅस्टिक कचऱ्याचे दुष्परिणाम व त्याच्या पुनर्वापराबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी अभिनेते चिन्मय उदगीरकर, गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, प्राचार्य डॉ. विजय ठाणगे, राजेश पंडित, सुधीर डागा आदी मान्यवर उपस्थित होते.

## रेणुका माता यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी रणजित बडाख



**मालुंजा बुद्रुक** : श्रीरामपूर तालुक्यातील मालुंजा बुद्रुक येथे रेणुका माता यात्रोत्सव ५ एप्रिलपासून सुरू होत असून, यात्रेनिमित्त ग्रामस्थांच्या बैठकीत यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी रणजित दिनकर बडाख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सरपंच तथा प्रशासक अच्युतराव पाटील बडाख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उपाध्यक्षपदी अशोक बाळासाहेब गायकवाड, कार्याध्यक्षपदी किरण गोपीनाथ गायकवाड यांची निवड करण्यात आली. यात्रोत्सव ८ एप्रिलपर्यंत चालणार आहे. यात्रेनिमित्त गंगाजल कावड मिरवणूक, देवी अभिषेक, मुखवटा मिरवणूक तसेच शेवटच्या दिवशी कुस्त्यांचा जंगी हगामा आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यासह बाहेरील नामवंत मल्ल यात सहभागी होणार आहेत. सध्या मंदिर परिसर सुशोभिकरण व विद्युत रोषणाईची कामे सुरू असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## चांदेगावच्या अक्षता भांड यांना 'पीएचडी' प्रदान



**आंबी** : राहुरी तालुक्यातील चांदेगाव येथील कन्या अक्षता चंद्रकांत भांड यांनी भारतीय पशुचिकित्सा अनुसंधान संस्थान, इज्जत नगर, उत्तर प्रदेश येथून पी. एच. डी अर्थात आचार्य पदवी संपादन केली आहे. ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीने जिद्दीच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण पंचक्रोशीत त्यांचे कौतुक होत आहे. डॉ. अक्षता या केशव गोविंद विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत भांड यांच्या कन्या आहेत. विशेष म्हणजे, दोन वर्षांपूर्वीच त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'पशुधन विकास अधिकारी-वर्ग-१' पदी निवड झाली होती. प्रशासकीय सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी आपले संशोधन कार्य ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. महेंद्रन यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केले. अक्षता यांचे प्राथमिक शिक्षण चांदेगावच्या जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण केशव गोविंद विद्यालय,बेलापूर खुर्द व चंद्रेश्वर माध्यमिक विद्यालय, चांदेगाव येथे झाले.

## गैरसमज पसरवणाऱ्या चॅनेलची निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार : प्राजक्त तनपुरे



**राहुरी** : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आहिल्यानगर येथील काही लोकल चॅनेल्सकडून चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या जात असल्याचा आरोप माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केला आहे. अशा प्रकारच्या बातम्यांमुळे कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये गैरसमज निर्माण होत असून निवडणुकीचे वातावरण दूषित होत असल्याचे त्यांनी सांगितले. तनपुरे म्हणाले की, आपण निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट असून त्यासाठी तयारीही सुरू आहे. मात्र, आहिल्यानगर येथील काही चॅनेल्सकडून जाणूनबुजून अफवा पसरवून गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे संबंधित चॅनेल्सविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, राहुरीतील राजकीय हालचालींना वेग आला असून विविध पक्षांकडून उमेदवारीबाबत चाचपणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर चुकीच्या बातम्यांमुळे वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुळाथडीत अवकाळीचा हल्लाबोल

### चक्रिवादळासह विजेचा कडकडाट शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान; वीजपुरवठा खंडित



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पानेगांव** : नेवासे तालुक्यातील पश्चिमेला तसेच राहुरी तालुक्यातील पुर्व भागातील मुळाथडी परीसरात बुधवार दि.१ रोजी सायंकाळी ६च्या दरम्यान पानेगांव मांजरी शिरेगांव खेडलेपरमानंद करजगांव वाटापूर आदी गावामध्ये अचानक आलेल्या चक्रिवादळ विजेचा कडकडाट पाऊसाने प्रचंड नुकसान झाले असून काढणीला आलेला गहू, कांदा, मका, हरभरा चाऱ्यांचे पिकं हातातोंडाशी आलेला घास बळिराजाचा हिरावला गेला आहे. तीन दिवसांपूर्वी अल्पशा प्रमाणात पाऊस झाला होता त्यामध्ये शेतकऱ्यांचे कमी प्रमाणात नुकसान झाले होते परंतु आजच्या पाऊसाने प्रचंड नुकसान झाले असून काढणीला आलेला कांदा, गहू, हरभरा अक्षरश: झोपले आहे. वादळीवाऱ्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे.

*तीन दिवसांपासून मुळाथडी परीसरात अवकाळी पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अगोदर अल्पशा प्रमाणात पाऊस झाला होता परंतु बुधवारी झालेल्या अवकाळीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.*

**परमानंद जाधव, अध्यक्ष, विठाई सहकारी संस्था शिरेगांव**

**(छाया- बाळासाहेब नवगिरे)**

# राहुरी तालुक्यातील अनेक गावात गारपीठ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील पश्चिम भागातील दरडगाव थडी, म्हैसगाव, कोळेवाडी शेरी चिखलठाण या ठिकाणी अवकाळी पाऊस व गारपीठ झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामध्ये कांदा, मका, गहू, टरबुज, खरबूज, टोमॅटो इत्यादी पिकावर गारांचा पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होऊन पिके भुईसपाट झाली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आश्रु अनावर झाले आहे. तोंडी आलेला घास अवकाळी पाऊस व गारपीठ झाल्याने हिरावला आहे. अचानक वातावरणीय बदल यामुळे गारपीठ मध्ये शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. यामुळे शेतकरी अस्वस्थ झाला आहे. शासनाने त्वरीत पीक पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी किंवा शेतकऱ्यांना सरसकट नुकसान जाहीर करून पंचनामा न करता पश्चिमेकडील भागातील शेतकऱ्यांना मदत घोषित करावी. शेतकऱ्यांना आता आर्थिक संकट आल्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. म्हणून शासनाने सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

## कोपरगावच्या कन्यांची राज्य संघात झेप; राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**कोपरगाव** : शहरासाठी अत्यंत अभिमानाची बातमी समोर आली आहे. सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल,कोपरगाव येथील दोन गुणवंत विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर महाराष्ट्र राज्य ड्रॉप रोबॉल संघात स्थान मिळवले आहे. दिनांक २ एप्रिल ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान गाझियाबाद येथे होणाऱ्या १७ व्या राष्ट्रीय ड्रॉप रोबॉल स्पर्धेसाठी वैष्णवी लोखंडे व अनामिका आहेर या विद्यार्थिनींची महाराष्ट्र राज्य संघात निवड करण्यात आली आहे.त्यांच्या या निवडीमुळे शाळेचा तसेच कोपरगाव शहराचा मान उंचावला असून सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशामागे प्रशिक्षक गणेश वाघ व गणेश मोरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षणामुळेच या विद्यार्थिनींनी राज्य पातळीवर आपली छाप पाडत राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे.कोपरगावच्या या कन्यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर खेळाडूंना प्रेरणादायी ठरणारे आहे.आता राष्ट्रीय स्पर्धेतही त्या उत्तम कामगिरी करून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बेलापूर झेडपी शाळेतील पहिलीच्या चिमुकल्यांचे वाजत-गाजत स्वागत



नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी बेलापूर खुर्द जिल्हा परिषद शाळेत प्रवेशित झालेल्या नवागतांचे स्वागत करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांनी वाहनाचे सारथ्य केले.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शाळेचा पहिला दिवस म्हणजे रडारड, पालकांची ओढाताण आणि शिक्षकांची मनधरणी... हे समीकरण बेलापूर खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने यंदा खोडून काढत वाजत-गाजत प्रभात फेरी काढून एक आगळेवेगळे स्वागत केले. विशेष म्हणजे गटशिक्षणाधिकाऱ्यांनी सजवलेल्या वाहनाचे सारथ्य करत यंदाचा शाळाप्रवेश सोहळा ऐतिहासिक केला.

काल बुधवारी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी बेलापूर खुर्द येथे नवागतांच्या स्वागतासाठी विशेष सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे. त्यांनी स्वतः सजवलेले वाहन चालवत नवागत विद्यार्थ्यांना वाद्यवृंदाच्या गजरात प्रभात फेरीद्वारे शाळेत आणले.

प्रशासकीय अधिकाऱ्याचा हा उत्साह पाहून गावकरी आणि पालक भारावून गेले होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी सामाजिक बांधिलकी जपत कार्यकर्ते राजेंद्र कुंकूलोळ यांनी सर्व विद्यार्थ्यांना वह्या आणि पेनचे वाटप केले. शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवा उत्साह दिसून आला.

कार्यक्रमास उपसरपंच ड. दीपक बारहाते, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा आरती महाडिक, उपाध्यक्ष रवींद्र गाढे, राजेंद्र कुंकूलोळ, सदस्या नयना बडधे, प्रणाली भगत, बिलाल सय्यद, आरिफ सय्यद, दिलीप बडधे, तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन उपाध्यापक श्रीकांत झिंजुर्डे यांनी केले. प्रास्ताविक करून आभार मुख्याध्यापिका प्रियंका शहाणे यांनी मानले.

# कोपरगावच्या नितीन वाबळेची भारतीय दिव्यांग क्रिकेट संघात निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव** : जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर कोपरगावच्या नितीन किशोर वाबळे यांनी उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय दिव्यांग क्रिकेट संघात स्थान मिळवले आहे. संजीवनी क्रिकेट अकॅडमीचे हे खेळाडू आगामी सिंगापूर व श्रीलंका दौऱ्यात भारताचे प्रतिनिधित्व करणार असून, त्यांच्या निवडीमुळे परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ३५ वर्षीय नितीन वाबळे यांचा जीवनप्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी झालेल्या अपघातात त्यांच्या डाव्या हाताला अपंगत्व आले.

मात्र, या परिस्थितीवर मात करत त्यांनी क्रिकेटची आवड जोपासली आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. दिव्यांग क्रिकेट बोर्ड ऑफ इंडिया अंतर्गत विविध स्पर्धांमध्ये त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर छाप पाडली. मार्च २०२६ मध्ये कोलकाता येथे झालेल्या निवड प्रक्रियेतून त्यांची भारतीय संघात निवड झाली. एप्रिलमध्ये सिंगापूर येथे होणाऱ्या टी-२० मालिकेत तसेच मे महिन्यात श्रीलंकेत होणाऱ्या स्पर्धेत ते गोलंदाजी अष्टपैलू म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. नितीन वाबळे यांनी भावना व्यक्त करत सांगितले की देशासाठी खेळण्याची संधी मिळणं हे माझ्यासाठी आयुष्यातील मोठं स्वप्न पूर्ण झाल्यासारखं आहे. मी भारतासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा पूर्ण प्रयत्न करेन.

नितीन यांच्या यशामागे प्रशिक्षकांचे मार्गदर्शन व मेहनत मोलाची ठरली आहे. याची दखल घेत सत्कार सोहळ्याात त्यांच्या प्रशिक्षकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. या यशानिमित्त संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी नितीन वाबळे यांचा सत्कार केला. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# महावीर जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महावीर जयंती निमित्त राहुरी शहरात भगवान महावीर स्वामी यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा उत्साहपूर्ण वातावरणात काढण्यात आली. जैन मंदिरापासून सुरू झालेली ही मिरवणूक शनीचौक, आझाद चौक, शिवाजी चौक, आडवी पेठ, नवी पेठ मार्गे पुन्हा जैन मंदिरात येऊन समाप्त झाली. मिरवणुकीत आनंद नवकार ग्रुपच्या सुमारे ३५ ते ४० बालगोपाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत लेझीमसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या बालगोपाळांच्या सादरीकरणाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

या प्रसंगी माजी खासदार प्रसाद तनपुरे, नगरसेविका डॉ. उषाताई तनपुरे, गटनेते हर्षदादा तनपुरे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई आदी मान्यवरांनी उपस्थित राहून मिरवणुकीचे स्वागत केले व भगवान महावीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमानिमित्त दुपारी १२ ते २ या वेळेत गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच संध्याकाळी नेहा ओस्तवाल यांच्या भक्तीसंगीताचा कार्यक्रम व इतर सांस्कृतिक उपक्रम पार पडले. या कार्यक्रमासाठी चंदनमल सुराणा, रमेशलाल सुराणा, संतोषकुमार लोढा यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.


# सोनेवाडी परिसरात सोमवारी रात्री झालेल्या पावसाने मोठे नुकसान

## शेतकऱ्यांची पंचनाम्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यात सोमवारी चार ते पाच वाजेच्या दरम्यान अवकाळी पावसाचा तडाका बसला आहे. तो पाऊस सोनेवाडी परिसरात झाला नसल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा निस्वास सोडला होता मात्र अचानक सायंकाळी साडेसात वाजता पुन्हा या पावसाने कहर करत तब्बल दोन तास धुमाकूळ घातला. वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पोहेगाव, चांदेकसारे सोनेवाडी,डाऊच परिसरात या पावसाचा मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात केलेले गहू पिक अजून देखील शेतात उभे आहे. ५०% शेतकऱ्यांचे गहू घरी गेले आहेत मात्र ५०% शेतकऱ्यांचे गहू पीक अजूनही शेतात उभे होते.

उन्हाळी कांद्याची मोठ्या प्रमाणात या परिसरात लागवड करण्यात आली आहे.



काल झालेल्या या पावसाने गव्हाचे पीक झोपले गेले. तर कांद्याच्या पाथीचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची मोठी दाणादाण उडाली. शेतात काढलेला कांदा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धावपळ झाली.ज्यांनी कांद्याच्या पोळी झाकून ठेवल्या होत्या या वादळी पावसाने त्याच्यावरचे कागद देखील उडाले. त्यामुळे अनेकांचा कांदा देखील भिजला आहे. या भिजलेल्या कांद्याचे मोठे नुकसान शेतकऱ्यांना सहन करावे लागणार आहे.

गोदावरी उजव्या कालव्याच्या कडेला असलेल्या भास्कर मुरलीधर जावळे यांच्या सर्वे नंबर ७१/२ मधील गहू पिक दोन एकर भुईसपाट झाले तर गोरक्षनाथ रस्त्याच्या बाजूला असलेल्या आबासाहेब भिवराज जावळे, सुशीला रावसाहेब जावळे यांचा देखील अनुक्रमे अडीच एकर व सव्वा एकर गहू जमीन दोस्त झाला. गहिनाजी गोपीनाथ जावळे व यमाजी नानासाहेब जावळे यांच्या गव्हाचे शंभर टक्के नुकसान झाले. परिसरातील शेती पिकांच्या नुकसानीची पाहणी कृषी व महसूल विभागाने करून तातडीने पंचनामे करावे व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी कोपरगाव तालुका शेतकरी समन्वयक समितीचे सदस्य विठ्ठलराव जावळे यांनी केली आहे.

# ओझर खुर्दमध्ये संतप्त महिलांचा ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा

## वीज बिल थकल्याने पाणीपुरवठा ठप्प



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : वीज बिल न भरल्यामुळे संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीचा वीज पुरवठा महावितरणने खंडित केला होता. परिणामी, नागरीकांना पाणी मिळत नसल्याने सोमवारी (३० मार्च) महिलांनी आक्रमक पवित्रा घेत ग्राम

पंचायतीवर 'हंडा मोर्चा' काढला होता. मिळालेल्या माहितीनुसार, ओझर खुर्द ग्रामस्थांनी नियमित पाणीपट्टी भरूनही त्यांना पाणी मिळत नाही असा दावा आंदोलक महिलांनी केला. विहिरीवरील वीज पुरवठा तोडल्याने गेल्या काही दिवसांपासून नळाला पाणी आलेले नाही. याबाबत सरपंच गिरिजा साबळे, उपसरपंच दगडू शेपाळ आणि ग्रामसेवकी ज्योती विधाटे यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप आंदोलक महिलांनी केला आहे.

पाणी नसल्याने गावातील महिलांना उन्हातान्हात गावाबाहेरील सरकारी विहिरीवरून पाणी आणावे लागत आहे. यामुळे कामावर जाणाऱ्या महिलांची रोजंदारी बुडत असून त्यांचा संपूर्ण दिवस केवळ पाणी भरण्यातच जात आहे. मूलभूत सुविधेसाठी एवढी कसरत करावी लागणे, हे ग्रामपंचायतीचे मोठे अपयश असल्याची प्रतिक्रिया उपस्थित महिलांनी दिली. दरम्यान सोमवारी सकाळी महिलांचा संयम सुटला आणि त्यांनी रिकामे हंडे घेऊन ग्रामपंचायत कार्यालयावर धडक दिली. यावेळी महिलांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याना जाब विचारला असता आंदोलक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाली, ज्यामुळे वातावरणात अधिक तणाव निर्माण झाला होता.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु एमआर १७२/२०२५
नेवासा दिनांक २३/०१/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-अब्बास मोहीद्दीन शेख रा. महालक्ष्मी हिवरे ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा नालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./ कु. अब्बास मोहीद्दीन शेख रा. महालक्ष्मी हिवरे ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव - अब्बास मोहीद्दीन शेख, गावाचे नाव-महालक्ष्मी हिवरे, जन्म दिनांक-०५/०६/१९६१

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहतिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### पोटनिवडणुकीत वारसांना संधी

बारामतीमध्ये पोटनिवडणूक होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त झाली होती. अजित पवार यांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार ही निवडणूक लढवणार आहेत. बारामती हा पवार घराण्याचा बालेकिल्ला राहिला आहे, त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीला विशेष महत्त्व आहे. सुनेत्रा पवार सध्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. बारामतीमध्ये त्या 'वहिनी' म्हणून ओळखल्या जातात. जानेवारी २०२६ मध्ये वि मान अपघातात अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला आहे.

दुसरीकडे, या जागांवर उमेदवार उभे करायचे की नाही यावर विरोधी पक्षांमध्ये चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने दोन्ही जागांवर उमेदवार उभे न केल्यास निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे सांगत काँग्रेसनेही आपला दावा मांडला आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, या दोन्ही जागांसाठी २३ एप्रिलला मतदान होणार असून ४ मे ला निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल.

### 'साकळाई'ला मंत्रीमंडळाची मान्यता, विखेंच्या पाठपुराव्याला यश

देण्याचा शब्द दिला होता. त्यानंतर सध्या पालकमंत्री असलेल्या राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या योजनेसाठी आपली सर्व ताकद पणाला लावली होती. जलसंपदा मंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांनी या योजनेच्या कामाचा विशेष पाठपुरावा केला. याच योजनेला १ एप्रिलला झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत अंतीम मंजुरी मिळाली. आता ही योजना १,२३४. १३ कोटी रुपये खर्चून पुढील चार वर्षांत पूर्ण केली जाणार आहे.

खरीप हंगामात १५ जुलै ते १५ ऑक्टोंबर या काळात पाणी उपसा करुन जलसाठ्यांचे पुनर्भरण केले जाणार आहे. यासाठी म्हैसगाव येथे तत्काळ पंपगृह बांधण्यात येणार आहे. त्यानंतर इतर तीन पंपगृहही बांधले जाणार आहेत. चार पंपगृह व तीन वितरींकाडरे एकूण चार टप्प्यात हे काम पूर्ण केले जाणार आहे. हे पाणी तब्बल २०८.३४ मिटर उपसा करुन चिखली व घुटेवाडी येथील डोंगरावरील वितरण हौदात सोडण्याचे नियोजन आहे. प्रकल्पासाठी एकूण ३९.७१ हेक्टर क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३०.२२ हेक्टर खाजगी क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी अनेक भाषणांम ध्ये सांगितले होते की, ही योजना पूर्ण करणार असू, तर आम्हीच ती पूर्ण करू. आज अखेर या योजनेला मंजुरी मिळाली आहे. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, स्वर्गीय शिवाजीराव कार्डिले ,माजी आमदार बबनराव पाचपुते आणि आमदार विक्रम पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेला आज मान्यता मिळाल्याचे मत डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले.प्रस्तावित कार्यक्रमानुसार प्रकल्पाची सर्व कामे ४ वर्षाच्या कालावधीत पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पुढील चार वर्षांत ही सगळी कामे पूर्ण होतील, असे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी यांनी सांगितले तसेच साकळाई उपसा सिंचन योजनेस मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले आहे.

### श्रीरामपूरच्या 'कॉटन फाइल्स'चा नाशिक पोलिसांकडून पर्दाफाश!

प्रत्यक्षात माल खराब होता, कर्ज बोगस होते आणि फायदाही सूत्रधारांनी खिशात घातला. एफआयआरनुसार, आरोपींनी कापूस चांगला आहे असे भासवून बँकेला फसवले. गोडाऊनमधील मालाची गुणवत्ता पडताळण्याची जबाबदारी कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर होती, पण ते देखील फसवणुकीच्या कटात सहभागी झाल्याचा आरोप आहे. या प्रकाराने तारण माल व्यवस्थापन प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार होत असल्याचे उघड केले. बँक, कंपनी आणि आरोपी यांच्यातील समन्वयाने शेतकऱ्यांना आणि बँकेला फसवण्याचा प्रयत्न झाला. नांदगाव पोलिसांसह नाशिक ईओडब्ल्यू (आर्थिक गुन्हे शाखा) सध्या तपास करत आहे. फरार आरोपी संतोष पाटील याला लवकरात लवकर जाळ्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणात आणखी काही आरोपी आणि बँक अधिकाऱ्यांवरही शक्यता आहे. पोलिस सूत्रांनी सांगितले की, ही फसवणूक केवळ एका गोडाऊनपुरती मर्यादित नसून, अशा प्रकारचे इतर गोडाऊन आणि कर्ज प्रकरणे तपासली जात आहेत. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक सुनील बडे व संतोष चव्हाण हे करीत आहेत.

# महाराष्ट्र बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सोन्याची अंगठी केली परत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बेलापूर येथे ग्राहकाची चुकून राहिलेली सोन्याची अंगठी शाखेचे कर्मचारी व अधिकारी यांनी प्रामाणिकपणे परत केली असून याबद्दल ग्रामस्थांनी सर्वांचे कौतुक केले आहे. बेलापूर येथील व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत लड्डा हे नेहमीप्रमाणे बँकेत गेले होते तेथे त्यांनी लॉकरमध्ये काही वस्तू ठेवल्या परंतु त्या ठेवत असताना एक सोन्याची अंगठी



लॉकरच्या खाली पडली, ही बाब त्यांच्या लक्षात आली नाही. त्यानंतर ते आपल्या कामाला निघून गेले. परंतु दुपारच्या वेळेस बँकेत फेरफटका मारत असताना बँकेचे कर्मचारी अजय डमाळे यांना ती सोन्याची अंगठी दिसली. त्यांनी ती अंगठी प्रामाणिकपणे शाखाधिकारी राजेश परदेशी यांच्याकडे जमा केली. बँकेचे शाखाधिकारी परदेशी यांनी दिवसभर बँकेत कोण आले होते कुणी लॉकरमध्ये वस्तू ठेवल्या याची सविस्तर माहिती घेतली. त्यात बेलापूर येथील प्रशांत लड्डा यांनी लॉकरमध्ये काही वस्तू ठेवल्याचे लक्षात आले. बँक शाखाधिकारी परदेशी यांनी तातडीने प्रशांत लड्डा यांचेशी संपर्क साधला असता ते बाहेरगावी गेले होते त्यामुळे काल बँकेला सुट्टी असतानाही शाखाधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना बोलावून त्यांची ती सोन्याची अंगठी प्रामाणिकपणे परत केली.

## पाणीपुरवठा न झाल्यास ग्रामपंचायतीला टाळे ठोकण्याचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गाजगाव येथे मागील दीड महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, पाईपलाईन फुटल्यामुळे गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. याबाबत तातडीने उपाययोजना करून तीन दिवसांत सुरळीत पाणीपुरवठा करावा, अन्यथा ४ एप्रिल रोजी ग्रामपंचायतीला टाळे ठोकण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. ग्रामस्थांनी ग्रामविकास अधिकारी वाबळे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गावातील मुख्य रस्त्याच्या कामादरम्यान अनेक पाणीपुरवठा पाईपलाईन फुटल्या असून त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. पळसगाव धरण परिसरातील विहिरीत पाणी उपलब्ध असतानाही योग्य नियोजनाअभावी नागरिकांना पाणी मिळत नाही. तसेच 'हर घर जल' योजनेअंतर्गत सुमारे ४८ लाख रुपयांची योजना अपूर्ण अवस्थेत असून त्याचा नागरिकांना कोणताही लाभ मिळालेला नाही. त्यामुळे गावातील अनेक भागांत पाणीटंचाई तीव्र झाली आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून तात्काळ टँकरद्वारे प्रत्येक गल्लीत पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर कैलास कांबळे, गुलाब शाह, संदीप धुमाळ यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## 'सखे गं साजनी' मराठी चित्रपट टिम शिर्डीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या 'सखे गं साजनी' या मराठी चित्रपटाच्या संपूर्ण टीमने शिर्डीत येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी प्रसिद्ध अभिनेते अभिजीत खांडकेकर, अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्यासह चित्रपटातील इतर कलाकार व तांत्रिक सदस्य उपस्थित होते.




साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत चित्रपटाच्या यशासाठी प्रार्थना करण्यात आली. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सर्व कलाकारांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना अभिनेत्री प्रार्थना बेहेरे म्हणाली की, ३ तारखेला प्रदर्शित होणारा 'सखे गं साजनी' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांसाठी विशेष ठरणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण थायलंडमध्ये करण्यात आले असून मराठी चित्रपटसृष्टीसाठी हा एक वेगळा अनुभव आहे. कथानक अत्यंत रंजक असून प्रेक्षकांना नक्की आवडेल, असा मला विश्वास आहे. माझ्या प्रत्येक कामाची सुरुवात मी साईबाबांच्या आशीर्वादानेच करते. आजही येथे येऊन साईंचे आशीर्वाद घेतले.अभिनेता अभिजीत खांडकेकर यांनीही चित्रपटाबाबत माहिती देताना सांगितले की, या चित्रपटाचे संपूर्ण चित्रीकरण वेगळ्या पद्धतीने करण्यात आले आहे. कथा, सादरीकरण आणि लोकेशन यामुळे प्रेक्षकांना नवा अनुभव मिळेल. मराठी प्रेक्षकांनी या चित्रपटाला नक्की प्रतिसाद द्यावा. असे आवाहन केले. यावेळी चित्रपटाचे सहनिर्माते अभिषेक वाकचौरे उपस्थित होते.

## फादर विल्फ्रेड सल्ढाणा 'एज्युकॉन' पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** येथील भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळा फाऊंडेशनचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड मार्टिन सल्ढाणा यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल एज्युकॉन पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

'नवराष्ट्र'तर्फे छत्रपती संभाजीनगर येथे दि. ३१ मार्च रोजी आयोजित सन्मान सोहळ्यात राज्याचे मंत्री अतुल सावे व खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

फादर सल्ढाणा यांनी गेल्या चार दशकांपासून ग्रामीण भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित ठेवत उल्लेखनीय कार्य केले आहे. सन २००० मध्ये वाहेगाव येथे 'सेंट मेरी स्कूल'ची स्थापना करून त्यांनी ग्रामीण भागात इंग्रजी शिक्षणाची नवी दिशा दिली. त्यानंतर 'भारतरत्न मदर तेरेसा इंग्लिश स्कूल'च्या




माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य घडविले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये आधुनिक व संस्कारक्षम शिक्षणावर त्यांचा विशेष भर असून सुसंस्कृत नागरिक घडविण्याचा त्यांचा ध्यास आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव मानला जात आहे.

## शिक्षणासोबत पर्यावरणाचा संगम; दिघेवस्ती शाळेचा उपक्रम ठरला आदर्श मॉडेल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** शिक्षणासोबत पर्यावरण संवर्धनाची प्रभावी जोड देत दिघेवस्ती (धानोरे) येथील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने पुन्हा एकदा आपल्या कार्याची दमदार छाप उमटवली आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत आयोजित उत्कृष्ट परसबाग स्पर्धा २०२५–२६ मध्ये या शाळेने 'उत्तेजनार्थ पारितोषिक' पटकावत राहुरी तालुक्याचा मान अभिमानाने उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या कष्ट, जिद्द आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनातून उभी राहिलेली ही परसबाग केवळ भाजीपाला उत्पादनापुरती मर्यादित नसून, ती शिक्षणाचा जिवंत प्रयोग ठरली आहे. शाळेच्या परिसरात हिरव्यागार वातावरणात विविध भाज्यांची लागवड करण्यात आली असून, विद्यार्थ्यांनी स्वतः श्रम करून निसर्गाशी घट्ट नाते जोडले आहे. या उपक्रमातून स्वावलंबन, श्रमसंस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला जात आहे. या यशामागे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि नियोजनबद्ध प्रयत्न मोलाचे ठरले. शिक्षकवृंद अनिल घोलप, संजय बोकंद,लता खराडे,सचिन पारेकर ,वंदना कोरुलकर , सोमनाथ अनाप, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ यांच्या एकजुटीने परसबाग बहरली. गाव, शाळा आणि विद्यार्थी यांचा एकत्रित 'हरित संकल्प'च या यशाचे खरे गमक ठरल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

या उपक्रमाला गटशिक्षणाधिकारी मोहनीराज तुंबारे, शिक्षण विस्तार अधिकारी जयश्री कार्ले, इंदुमती देवरे, नंदा गवळी तसेच केंद्रप्रमुख विद्या भागवत, निलिमा गायकवाड आणि रविंद्र बोरुडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. बीआरसी अधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य तसेच इतर सर्व समिती अध्यक्ष व सदस्य आणि ग्रामस्थांनी शाळेच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

दिघेवस्ती शाळेची ही हरित वाटचाल आता




इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शाळा म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे, तर जीवन घडवणारी प्रयोगशाळा आहे, हेच या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.

## बेलगाव येथे अपघात एक ठार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर :** शहरालगत ऋषी बाळासाहेब शेटे हा शेटे वस्ती भग्गाव येथील तरुण ठार झाल्याची घटना सकाळी नऊ वाजेच्या सुमारास जगदाळे पाटील वस्ती, बेलगाव येथे घडला. या घटनेत चारचाकी वाहनाने दुचाकीला उडावल्याने तो गंभीर जखमी झाला होता. जखमी अवस्थेत त्याला वैजापूरच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यास मयत घोषित करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन व चालकास ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## हनुमान मंदिर येथे आज विविध धार्मिक कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील रेल्वे स्टेशनजवळील जुने जागृत देवस्थान श्री हनुमान मंदिर येथे उद्या गुरुवार दि. २ एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती हनुमान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष मनीलाल पोरवाल व खजिनदार सुनील गुप्ता यांनी दिली. गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी पहाटे ३.३० वाजता महाअभिषेक, सकाळी ६.०० वाजता हनुमान जन्मोत्सव सायंकाळी ५.३० व हनुमान चालीसा पठण, ढोल पथक तसेच अतिषबाजी व नंतर स्व. चंद्रप्रकाश खुशीराम गुप्ता यांच्या प्रेरणेने सुरु असलेला महाप्रसाद भंडारा आयोजित केला आहे. सायंकाळी ८.०० वा. विविध मान्यवरांचे हस्ते श्रीहनुमान जन्मोत्सवानिमित्ताने महाआरतीचे आयोजन केले आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष मनीलाल पोरवाल, खजिनदार सुनील गुप्ता, सुभाष फेगडे, चंपालाल फोफळे, गजेंद्र डावखर, कल्याण कुंकूलोळ, मोहन नारंग, वाल्मिक राऊत, तेजस जंबे, धनेश चित्ते, जय गोहिल, भूषण सोनवणे, प्रसाद आंधळे, आयुष्य फोफळे, पराग पोरवाल, पक्षाल पोरवाल, हनुमान भजनी मंडळ, श्री हनुमान मंदिर खिचडी प्रसाद सेवेकरी मंडळ, साई परिवाराचे अरुण गुप्ता व सदस्य यांनी केले आहे. पौराहित्य प्रल्हाद पांडे, श्रीपाद गोरे यांनी केले आहे.

# डॉ. प्रीतम गेडाम यांना राज्यस्तरीय 'राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई:** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठित 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' नुकताच नागपूरचे प्रसिद्ध लेखक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रीतम भी. गेडाम यांना प्रदान करण्यात आला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रात पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले. व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात गेल्या १५ वर्षांपासून लेखणीच्या माध्यमातून प्रभावी जनजागृती केल्याबद्दल 'लेखक' गटातून त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र



आणि धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. गेडाम यांनी २००८ पासून व्यसनमुक्तीसाठी पथनाट्ये, समुपदेशन आणि लेखनाला सुरुवात केली होती. विशेष म्हणजे, सामाजिक विषयांवर सर्वाधिक द्विभाषिक लेख लिहिण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे.

या सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. गेडाम सध्या नागपूरच्या रायसोनी एज्युकेशन ग्रुपमध्ये विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशामुळे नागपूर शहरासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## खटोड कन्या शाळेस प्रोजेक्टर भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील हिंद सेवा मंडळाच्या भि. रा. खटोड कन्या विद्यालयास नासिक विभाग शिक्षक मतदार संघाचे विद्यमान आमदार किशोर दराडे यांच्या विकास निधीतून नुकताच प्रोजेक्टर प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरिश मुंढे,तालुका प्रमुख अजित देठे, तालुका प्रतिनिधी अक्षय थोरात व शशिकांत थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यालयाचे चेअरमन दत्तात्रय साबळे प्राचार्या डॉ मंगला भोसले पर्यवेक्षिका मंगला डोळस व विद्यार्थीनींनी यांच्याकडे प्रोजेक्टर सुपूर्द केला. या अगोदरही आमदार दराडे यांनी शाळेस संगणक, प्रिंटर तसेच प्रयोगशाळा साहित्य भेट दिले आहे. यावेळी शशिकांत थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. चेअरमन दत्तात्रय साबळे यांनी आपल्या भाषणात आमदार दराडे यांना विशेष धन्यवाद दिले. या प्रोजेक्टरचा उपयोग अध्ययन व अध्यापन करण्यासाठी होईल असे ते म्हणाले तसेच आगामी काळात देखील शाळेय विकासासाठी सहकार्य करावे असे आवाहन केले. सुत्रसंचालन सेवक प्रतिनिधी आदिनाथ जोशी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा सतिश म्हसे यांनी केले.यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# ग्राम रोजगार सहाय्यक विविध मागण्यासाठी संपावर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यक संपवार गेले असून गंगापूर तालुक्यातील ग्राम रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिल २०२६ पासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. याबाबतची निवेदन गंगापूर तालुका संघटनेच्या वतीने गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा महत्त्वाचा घटक म्हणजे ग्राम रोजगार सहाय्यक होय.गावातील मजुरांच्या काम मागणी पासून मस्टर डिमांड देणे, हजेरी घेणे, ऑनलाईन करणे, या सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या



ग्रामरोजगार सहाय्यक पार पाडत असतात.

मागील १७ वर्षापासून फिक्स मानधन,प्रवास भत्ता, अपघाती विमा, स्टेशनरी खर्च, कायमस्वरूपी सेवेत रुजू करून घेणे, मिळणार मानधन वैयक्तिक खात्यात जमा होणे, वैद्यकीय सेवा अशा विविध मागण्यांसाठी राज्यातील २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यक वेळोवेळी आंदोलने करत आहेत.यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आठ हजार रुपये मानधन व दोन हजार रुपये प्रवास भत्ता लागू करू अशी घोषणा करून जीआरही प्रसिद्ध केला होता. परंतु १८ महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी अजूनही न झाल्याने व वि बी जि रामजी योजेनेत रोज मजुरांची फेस ऑथेंटीकेशन करणे त्यासाठी कसलाही पेट्रोल खर्च मोबाईल खर्च मिळत नसल्याने राज्यातील ग्रामरोजगार सहायकांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

निवेदनावर तालुका अध्यक्ष शकील शेख, अप्पासाहेब पिंपाळे,अक्रूर निकम,सोमनाथ दुबिले, बाबासाहेब जमादार,शंकर गुंडाळे, ईश्वर खोमणे, विजय पवार,विकास पल्हाळ, भरत पवार, कृष्णा गायके, रावसाहेब तुपे, राहुल जाधव, भगवान वाघ, विठ्ठल म्हस्के,किशोर महारनोर,विठ्ठल पवार,रंगनाथ काळवणे,कैलास अस्टेकर,रामेश्वर अलंजकर सह तालुक्यातील रोजगार सहायकांच्या सह्या आहेत.

## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि .०२ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५६<br>२४६<br>४८० | २-९ | २१०<br>२८९<br>२२५ | जोड<br>२१-३९-१५-४८-९० |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६<br>४९०<br>३४४ | १-९ | १९०<br>२८०<br>२२६ | जोड<br>१२-७०-४३<br>९५-०८ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>१८० | ५-४ | १४९<br>१३०<br>११२ | जोड<br>५६-१४-१९-<br>८३-४० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द•ख•ल

### श्रीगोंदा वकील संघाची निवडणूक उत्साहात; बिनविरोधमुळे नवा विश्वास

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा वकील संघाची निवडणूक आज पार पडली त्यामध्ये श्रीगोंदा वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. जयंत शिंदे यांची बिनविरोध निवड झाली असून, महिला उपाध्यक्षपदी ॲड. विजया घोडके यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. महिला सचिवपदी ॲड. सविता भिसे (अस्वले) यांचीही बिनविरोध निवड होऊन महिला नेतृत्वाला भक्कम संधी मिळाली आहे.दरम्यान, उपाध्यक्षपदी ॲड. संपत विधाते, सचिवपदी ॲड. संदीप सातपुते आणि खजिनदारपदी ॲड. राजन नहार हे निवडणूक लढवून विजयी झाले.या निवडींमुळे वकील संघात एकजूट आणि समन्वयाची नवी दिशा दिसून येत आहे. बिनविरोध म्हणजे फक्त निवड नाही, तर विश्वासाचा ठसाअशीच भावना अनेक सदस्यांनी व्यक्त केली. नव्या कार्यकारिणीकडून संघटनेच्या कामकाजात गती, पारदर्शकता आणि न्यायव्यवस्थेच्या उन्नतीसाठी ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.निवडून आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, वकील संघाच्या भविष्यासाठी नव्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

### भाळवणीत वीज वितरण विरोधात मोर्चा




**भाळवणी** : पारनेर तालुक्यातील भाळवणी येथे सततच्या भारनियमनाच्या विरोधात येथील ग्रामस्थांनी वीज वितरणाच्या कार्यालयावर मोर्चा नेत आपला रोष व्यक्त करत निवेदन सादर केले. गेल्या काही दिवसांपासून भाळवणी व परिसरातील वाड्यावस्त्यांवर रात्री ६ ते १० या वेळेत भारनियमन केले जाते. याचा फटका येथील व्यावसायिक, विद्यार्थी व दुध उत्पादकांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. सततच्या त्रासाला कंटाळून ग्रामस्थांनी मोर्चाने जात महावितरणचे शाखा अभियंता विलास पाटील यांना निवेदन देत चर्चा केली. यावेळी वरिष्ठांशी बोलून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाबाजी तरटे, माजी पंचायत समिती सदस्य विकास रोहोकले, तालुका दुध संघाचे चेअरमन संदीप ठुबे, बबनराव भुजबळ, दत्तात्रय रोहोकले, ढवळपुरी येथील दुर्गादेवी दुध संकलन केंद्राचे संचालक सुखदेव चितळकर, संभाजी आमले, संदीप रोहोकले, अविनाश राऊत, प्रमोद गोडसे, जितेंद्र रोहोकले, योगेश शिंदे, युवराज रोहोकले, अमोल पवार, विकास चेमटे, सुनील चेमटे, मनोहर पारखे, प्रकाश रोहोकले, गणेश तळेकर, लहान रोहोकले, सर्जेराव रोहोकले, भागुजी रोहोकले, बी. वाय. रोहोकले, राजेंद्र मुगदे, विठ्ठल रोहोकले, निवृत्ती रोहोकले, सनी कदम, ज्ञानदेव रोहोकले,बाबाजी चेमटे आदींसह व्यावसायिक,दुध उत्पादक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गॅस दरवाढीवर प्रशासनाची तातडीची कारवाई

**अहिल्यानगर** : एलपीजी गॅस दरवाढीविरोधात अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेने काढलेल्या मोर्च्याची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पुरवठा अधिकारी हेमा बढे यांनी संघटनेचे पदाधिकारी व गॅस कंपन्यांच्या सेल्स मॅनेजर यांची बैठक घेऊन महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

फेब्रुवारी २०२६ पूर्वी ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर असलेला एलपीजी गॅस दर युद्धानंतर वाढत जाऊन सध्या १०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या दरवाढीमुळे रिक्षा चालकांचे आर्थिक गणित कोलमडले असून व्यवसाय करणे कठीण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गॅस कंपन्यांकडून मनमानी दरवाढ होत असल्याचा आरोप करत, वाहनांमध्ये गॅस भरताना कमी ॲव्हरेज मिळत असल्याने हेराफेरी होत असल्याचीही तक्रार मांडली. रिक्षा चालक दिवसभर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, मात्र वाढत्या दरांमुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे. बैठकीदरम्यान पुरवठा अधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कंपनीकडून ज्या दराने गॅस व पेट्रोल पुरवठा होतो, त्याच दराने ग्राहकांना वितरण करावे. दरफलक (रेट बोर्ड) पंपावर दर्शनीय ठिकाणी लावावा. प्रत्येक ग्राहकाला गॅस भरण्यानंतर बिल देणे अनिवार्य राहील. दरम्यान, संघटनेच्या वतीने शहरातील एचपी व इंडियन ऑइलचे बंद असलेले गॅस पंप तातडीने सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.

# ट्रकचालकास मारहाण करून लुटमारप्रकरणी तीन आरोपी जेरबंद

## जामखेड पोलीसांनी १२ तासात आरोपींना केली अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : पुणे येथुन कोंबडीचे खत घेऊन माजलगावकडे जात असताना जामखेड साकत रोडवर सावरगाव जवळ ट्रक चालकास मोटारसायकल वरुन आलेल्या तीन जणांनी ट्रकला मोटारसायकल आडवी लावली. यानंतर ट्रकच्या काचा फोडून व ट्रकचालकास महारण करुन लुटमार केली. या प्रकरणी तीन आरोपींना पोलिसांनी अवघ्या बारा तासातच अटक केली आहे.

या प्रकरणी शुभम सुर्यभान चव्हाण, शुभम ज्ञानोबा चव्हाण व राम अशोक अडाले व एक अल्पवयीन मुलगा सर्व राहणार सावरगाव ता. जामखेड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की दि ३० मार्च रोजी फीर्यादी संतोष बिभीषण फरताडे, ड्रायव्हर रा. सोमनाथ वाडी ता. जिल्हा बीड व बाळु शामराव तांबे रा. परांडा जिल्हा धाराशिव हे दोघे ट्रक क्रमांक एम एच १४ एल एक्स ९९६९ या मधुन पुणे येथुन माजलगाव या ठिकाणी कोंबडीचे खत घेऊन चालले होते. दि ३१ मार्च रोजी




रात्री त्यांचा ट्रक हा जामखेड साकत रोडवर पाच कीमी अंतरावर आला. यावेळी त्या ठिकाणी स्पिड ब्रेकर होते त्यामुळे ट्रक चालकाने गाडीचा वेग कमी केला. त्यानंतर तीन आरोपींनी ट्रकला मोटारसायकल आडवी लावली व ट्रकच्या काचा फोडल्या तसेच ट्रक मधिल दोघांना मारहाण करण्यास करुन चाकुचा धाक दाखवून बळजबरीने खिशातील रोख रक्कम व गाडीतील साहीत्य काढुन घेतले व फरार झाले.

यानंतरची घटना जामखेड पोलीसांना समजताच पोलीस पथकातील पो. ना. रविंद्र वाघ, पो. कॉ. देविदास पळसे, कुलदिप घोळवे व आकाश शेवाळे यांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी घटनास्थळी व परिसरात रवाना झाले. तपास करित असताना पोलिसांना सदरचे आरोपी सावरगाव येथील असल्याचे समजले. आरोपी शुभम सुर्यभान चव्हाण व राम अशोक अडाले यांना पोलिसांनी जामखेड तालुक्यातील सोनेगाव परीसरातुन ताब्यात घेतले तर तर शुभम ज्ञानोबा चव्हाण यास सावरगाव डोंगर भागातुन ताब्यात घेतले. विशेष म्हणजे जामखेड पोलीसांना अवघ्या १२ तासास आरोपींना अटक करण्यात यश आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे , अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, पोसई किशोर गावडे, पोसई पुष्कर कडू, पो. ना. रविंद्र वाघ, पो.कॉ. देविदास पळसे, कुलदिप घोळवे, आकाश शेवाळे, ज्ञानेश्वर बेल्हेकर, भागीरथ देशमाने, दत्तु बेलेकर, इश्वर माने, होमगार्ड भारत चव्हाण, संदिप चव्हाण, गणेश गायकवाड, दिंगाबर औचारे तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पो. कॉ. नितीन शिंदे व राहुल गुंडू यांनी केली आहे.

### शहापूर येथील 'त्या' पेट्रोल पंप चालकाची डिलरशिप रद्द करण्याची मागणी

**अहिल्यानगर** : नगर-पाथर्डी रोडवरील शहापूर येथील हिंदुस्तान पेट्रोलियमच्या आनंद पेट्रोल पंपावर डिझेलचे बिल मागितल्याच्या कारणावरून ग्राहक व त्याच्या मित्रावर लोखंडी रॉडने मारहाण केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात संबंधित सेल्समन व पंप कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार विशाल राजेंद्र बेरड यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडकडे पंपावरील गैरप्रकारांची तक्रार केली असून, त्यानंतर संबंधित पेट्रोल पंप बंद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, या पंपाची डिलरशिप तात्काळ रद्द करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

विशाल बेरड हे पेव्हर ब्लॉक व जेसीबी मशीन व्यवसाय करतात आणि त्यांच्या मशिनसाठी ते नियमितपणे आनंद पेट्रोल पंपावरून डिझेल घेत असतात. दिनांक २९ मार्च रोजी रात्री सुमारे साडेनऊच्या सुमारास ते आपल्या मित्र गणेश जरे यांच्यासोबत मोटारसायकलवरून संबंधित पंपावर गेले होते. त्यांनी सुमारे ३,५०० रुपयांचे डिझेल प्लास्टिकच्या ड्रममध्ये भरून घेतले व त्याचे पैसेही अदा केले.

मात्र, व्यवहारानंतर त्यांनी बिलाची मागणी केली असता, तेथील सेल्समन प्रशांत बेरड याने बिल देण्यास नकार दिला. यावरून वाद निर्माण झाला आणि तक्रारदार आणि त्याच्या मित्राला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

## अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात आणले पाणी

# ढोरजळगांव परिसरात पिकांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव परीसरात मंगळवारी सायंकाळी ७ वा झालेल्या मुसळधार अवकाळी पाऊस गारपिटीने गहु, कांदा ज्वारी उन्हाळी बाजरी तसेच फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले असुन हाता तोंडाशी आलेला घास नियतीने हिरावून घेतला आहे.

शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव परीसरात मंगळवारी सायंकाळी ७ च्या सुमारास सुमारे १ तास मुसळधार पाऊस व सोसाट्याचा वारा व काही प्रमाणात गारपीट झाल्यामुळे काढुन ठेवलेले गहु पीक कांदा तसेच फळबागा मध्ये आंब्याला मोठ्या प्रमाणात मोहर गळाला असुन अवेळी आलेल्या पावसामुळे बळिराजाचे अतोनात नुकसान झाले आहे. ठेवलेले गहु पीक कांदा



तसेच फळबागा मध्ये आंब्याला मोठ्या प्रमाणात मोहर गळाला असुन अवेळी आलेल्या पावसामुळे बळिराजाचे अतोनात नुकसान झाले आहे.

गेल्या कित्येक वर्षानंतर यावर्षी मार्च नंतर आता एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला अवकाळी पावसाने थैमान घातले असून आगामी काही दिवसामध्ये काढणीस तयार झालेल्या कांद्याच्या गाभ्यामध्ये अवकाळी पावसाचे पाणी गेल्यामुळे कांदा पीक पुर्णपणे वाया जाणार आसुन.

> मागील वर्षी सप्टेंबर आक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन बहुतांश शेतकऱ्यांनी कापणी प्रयोगावर आधारित विमा कंपनीला हेक्टर प्रमाणे पैसे भरून पिकांचा विमा भरला असताना सात महिने उलटुन ही विमा कंपनीच्या वतीने शेतकऱ्यांना अद्याप विमा नुकसान देण्यात आली नसुन एकीकडे शासनस्तरावर शेतकऱ्यांना विमा मिळण्याचा मार्ग मोकळा असे म्हटले जात असले तरी आगामी मान्सून हंगामा पुर्वी तरी पीक विमा मिळेल का?
>
> **– आनंता उकिर्डे, माजी सरपंच ढोरजळगांवने**

एकंदरीत शेतकरी कष्टाने पिकवितो खरा परंतु ज्यावेळी विक्रीला माल असतो त्यावेळी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करून व्यापारी लुटतो शासनाचे धोरणाचा विचार केला तर शेतक-याप्रती उदासिनता दिसुन येत असुन शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दाम मिळाला तरच भविष्यात शेतकरी व शेती व्यवसाय टिकेल अन्यथा शेतकरी शेती व्यवसायातून परावृत्त होण्याची भीती निर्माण झाली असुन सद्यस्थितीत गहु काढणीला आल्यानंतर खाजगी व्यापारी सर्रासपणे ते बावीचशे रूपये दराने खरेदी केली जात असुन त्यातुन खर्च सुध्दा निघणे मुश्किल आहे.

# मोकाट जनावरांचा धोका वाढला; जबाबदारी कोणाची पालिका की गोरक्षक?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : शहरात मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर मुद्दा निर्माण झाला आहे. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि वसाहतींमध्ये गाई, वळू, डुकरे, कुत्रे आणि बकऱ्यांचे कळप मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. या परिस्थितीमुळे अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

काही दिवसांपूर्वी पालिका प्रशासनाने मोकाट जनावरे पकडण्यासाठी मोहीम सुरू केली होती. मात्र जनावरे पकडताना त्यांच्यावर अन्याय होत असल्याचा आरोप करत गोरक्षकांनी आंदोलन छेडले. या आंदोलनामुळे प्रशासनाने ही मोहीम अघोषितपणे थांबवली. परिणामी, आधीच गंभीर असलेली समस्या अधिकच बिकट बनली आहे.

सध्या शहरात मोकाट गाई आणि वळू थेट नागरिकांच्या अंगावर धावून येत असल्याच्या घटना

### पाथर्डीकरांचा सवाल

वाढत आहेत. त्यामुळे नागरिकांना शहरात राहूनही जंगलात असल्याचा अनुभव येत आहे. विशेषतः शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला यांच्यासाठी हा प्रश्न अधिक धोकादायक ठरत आहे.

यासोबतच उघड्यावर टाकण्यात येणारा कचरा आणि अन्नपदार्थांवर डुकरांसह इतर जनावरे तुटून पडत असल्याने स्वच्छतेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दुर्गंधी, अस्वच्छता आणि रोगराईचा धोका यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

पालिकेची 'अभय योजना' प्रभावी ठरत नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. या योजनेच्या माध्यमातून नागरिकांना मोकाट जनावरांपासून खरेच अभय मिळेल का, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. निवडणुकीच्या काळात सक्रिय असणारे लोकप्रतिनिधी आणि नंतर मात्र निष्क्रिय होणारे नगरसेवक व तथाकथित समाजसेवक यांच्यावरही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम पुन्हा सुरू केली नाही, तर मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या दालनात वळू आणून बांधण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सचिन नागापुरे यांनी दिला आहे.



# शिक्षिकेचे दागिने विद्यार्थ्यांनी केले परत

## तिसगाव विद्यालयातील प्रकार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी** : तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेस केंद्रातील सर्व शिक्षक-शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषद यशस्वीरित्या संपन्न झाल्यानंतर जवळच्याच एका जिल्हा परिषद शाळेतून आलेल्या एका महिला शिक्षिकेचा सुमारे २ तोळे सोन्याचे मंगळसूत्र, कानातले व अंगठी असलेला बॉक्स वर्गखोलीतच राहून गेला.



दुसऱ्या दिवशी शाळा सुरू झाल्यानंतर विद्यालयातील विद्यार्थी शिवांश शिंदे, चैतन्य आठरे, संस्कार पवार, गौरव जाधव या जागरूक व प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास हा बॉक्स आला. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी तो बॉक्स थेट विद्यालयाच्या प्राचार्या सुनिता कवडीवाले यांच्या स्वाधीन केला. प्राचार्यांनी तत्परता दाखवत या संदर्भात केंद्रस्तरीय व्हॉट्सप ग्रुपवर माहिती प्रसारित केली. त्यानंतर संबंधित महिला शिक्षिकेने तात्काळ संपर्क साधून बॉक्स आपलाच असल्याची खात्री दिली. आवश्यक ती ओळख पटवून तो मौल्यवान दागिन्यांचा बॉक्स त्यांच्या स्वाधीन करण्यात आला. या संपूर्ण घटनेत विद्यार्थ्यांनी दाखवलेली प्रामाणिकता, जबाबदारीची जाणीव आणि सुसंस्कारांची झलक अत्यंत स्तुत्य ठरली. विद्यालयाच्या वतीने या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करून त्यांना बक्षिसे देण्यात आली.

# जामखेड शहरातील कॅफे सेंटरवर पोलिसांचा छापा, चालकावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : जामखेड शहरातील बीड रोडवरील 'कॅफे चेसऱ व र कर्जत उपविभागीय पोलीस विभागाच्या पथकाने धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. दैनिक राष्ट्र सह्याद्री ने वृत्त प्रसिद्ध करताच पोलीस उपअधीक्षक लोंखडे यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्री बातमीची दखल घेत जामखेड शहरात कॅफे वर छापा टाकला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कॅफेमध्ये पार्टिशन करून अश्लील चाळ्यांसाठी बंदिस्त रूम भाड्याने दिल्याप्रकरणी एका संशयितावर जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपअधीक्षक चे पथक जामखेड मध्ये येऊन कॅफेवर छापे टाकतात मग जामखेड चे पोलीस करता काय असा नागरिकांचा सवाल आहे जामखेड पोलीस गप्प का दिवसा ढवळया राजरोसपणे कॅफेमध्ये आशीलचाळे सुरू असुन मग जामखेड पोलीस गप्प का अशी जामखेड शहरात उलटसुलट चर्चा

**राष्ट्र सह्याद्री इफेक्ट..**

ला उधाण कोणाच्या आशीर्वाद ने जामखेड शहरात हे सर्व काय चालतय.

राहुल संदीप श्रीरामे (वय २५, रा. बटेवाडी, जामखेड) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे. सार्वजनिक ठिकाणीअश्लीलता पसरवून इतरांना त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त झाल्या होत्या. यातक्रारींची दखल घेत पोलिसांनी कॅफे चेसवर ३० मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता छापा टाकला. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध कॅफे चालकांचे धाबे दणाणले आहेत. पोलीस कॉ. मनोज लातूरकर यांनी दिलेल्या फियांदीवरून राहुल श्रीरामे याच्या विरोधात भारतीय न्याय संहिताकलम २९४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस फौजदार बबन मखरे, पोलीस हेड कॉन्स्टेबल अमोल भैलुमे, महिला पोलीस कॉन्स्टेबल वनमाला तोडमल, पोलीस कॉन्स्टेबल मनोज लातूरकर यांच्या पथकाने केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार एस. डी. कदम हे करत आहेत.




(छाया : दत्ता घाडगे)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील लंकेवाडी मध्ये श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दैनिक कार्यक्रमांमध्ये बुधवार दिनांक ८ एप्रिल रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत श्री हनुमंतरायांच्या मूर्तीचा भव्य मिरवणूक सोहळा आयोजित करण्यात आला होता.

पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील लंकेवाडी येथे हनुमान मूर्तीचा भव्य मिरवणूक सोहळा नूकताच संपन्न झाला.गावातील लंकेवाडी ते वडझिरे गावच्या मुख्य वेशीपासून मिरवणुकीला सुरुवात झाली.यावेळी पारंपारिक वाद्यांच्या गजरामुळे मिरवणुकीमध्ये रंगत वाढली. भाविक भक्तांच्या जय श्रीराम,जय हनुमान अशा गर्जनेमुळे वडझीरे परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी सर्व महिला भाविक भगव्या रंगाच्या साडी मध्ये दिसत होते. वडझिरे परिसरातील वातावरण यावेळी भगवामय झाले होते. मिरवणूक गावातील विठ्ठल मंदिर परिसरामध्ये आल्यावर भाविक भक्तांनी फुगड्या खेळल्या. भगवा रंग या मिरवणुकीचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.यावेळी ग्रामस्थान सह वडझीरे इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मुलांनी लेझीमचा डाव खेळला. दुपारी बारा ते सहा पूजा व होमहवन सोहळा संपन्न झाला. एवढे हरिभक्त परायण राजाराम भाऊ महाराज झरेकर सद्गुरु माऊली आश्रम पारनेर यावेळी उपस्थित होते. सायंकाळी ९ नंतर लक्ष्मण कांत व लंके व पवनपुत्र एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आणि वडझिरे इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य जयसिंग बबनराव लंके यांचे वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी सकाळी ८ ते १२ या वेळेमध्ये परमपूज्य पंढरपूरकर गुरुजी यांच्या वेदमंत्रांनी हनुमान मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. तसेच सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये कैवाल्याचा पुतळा संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथाकार, हभप गणेश महाराज वाघमारे, श्रीक्षेत्र विघ्नहर देवस्थान ओझर यांची सुश्राव्य प्रवचन रुपी सेवा आयोजित केलेली आहे. दुपारी १२ नंतर हनुमान तरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ वडझिरे यांचे वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

# शिरूर बस स्थानकातील निकृष्ट काम थांबवले

## स्ट्रक्चरल ऑडिट लवकरच

सचिन जाधव | राष्ट्र सह्याद्री

---------------

**शिरूर :** शिरूर बस स्थानकातील निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत प्रसिद्ध झालेल्या दै. राष्ट्र सह्याद्री च्या बातमीचा तात्काळ परिणाम दिसून आला असून, जुन्या संरक्षक भिंतीवर केवळ प्लास्टर करून सुरू असलेले काम अखेर थांबवण्यात आले आहे. पुणे विभागीय कार्यालयातील बांधकाम विभाग जे.ई. अभियंता अश्विनी सोमकुवर यांनी संबंधित कंत्राटदार व अभियंत्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करत हे काम त्वरित बंद करण्याचे आदेश दिले.स्थानकातील जुन्या व धोकादायक भिंतीवर केवळ प्लास्टर करून मलमपट्टी करण्याचा प्रकार सुरू असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. यापूर्वी छताचे प्लास्टर कोसळून महिला प्रवासी जखमी झाल्याची घटना घडलेली असतानाही प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप होत होता.

**दै राष्ट्र सह्याद्री इम्पॅक्ट**

दरम्यान, अधिकाऱ्यांनी महिला स्वच्छतागृहाशेजारी उभारण्यात आलेली पिण्याच्या पाण्याची पाणपोई चुकीच्या ठिकाणी असल्याचे मान्य करत ती लवकरच अन्य योग्य ठिकाणी स्थलांतरित करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच संपूर्ण बस स्थानकाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट लवकरच करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.गेल्या काही वर्षांपासून बीओटी तत्वावर सुरू असलेल्या या कामाबाबत प्रवासी व नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत होत्या. विविध आंदोलनांद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. विशेष म्हणजे, ११ एप्रिल २०२५ रोजी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नाराजी अधिकच वाढली होती.

बस स्थानकातील भिंतींना तडे जाणे, काँक्रीटीकरणात खड्डे पडणे,



तसेच पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था यामुळे प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर एखाद्याचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला होता. भाजपा महिला आघाडीच्या शिरूर शहर अध्यक्षा प्रिया बिरादार यांनीही याप्रकरणी निवेदन देत आंदोलन केलेले आहे त्यांनी पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. लोकमंथनच्या बातमीनंतर प्रशासनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे नागरिकांना दिलासा मिळाला असून, आता प्रत्यक्षात दर्जेदार काम व आश्वासनांची पूर्तता होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

द•ख•ल

## थोरांदळेत पुरी गुळवणीच्या महाप्रसादाची परंपरा

**निरगुडसर :** पाच पिंप गुळवणी, तीन लाखाहून अधिक पुऱ्या, तीनशे किलो कांद्याची चटणी हा महाप्रसाद बनवला जातोय आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे गावात निमित्त आहे. श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा, उत्तर पुणे जिल्हातील सर्वात मोठ्या हनुमान जन्मोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांसाठी गावातील साडेतीनशे कुटुंबातील महिला पुऱ्या लाटण्याचे तर पुरुष पुऱ्या तळण्याचे काम करतात ही पिढी जात महाप्रसाद बनवायची



परंपरा आजही मोठ्या उत्साहात सुरू आहे. थोरांदळे (ता. आंबेगाव) येथील ग्रामस्थ दरवर्षीप्रमाणे शिवकालीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या आपल्या जागृत श्री हनुमान जन्मसोहळा साजरा करून भाविकांना पुरी, गुळवणी व कांद्याची चटणी या महाप्रसादाचा आस्वाद देत असतात, आपल्या जागृत श्रीहनुमानचा जन्म सोहळाचा महाप्रसाद बनवण्यासाठी तरुणापासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वजण मोठ्या उत्साहात सहभागी होतात, यासाठी प्रत्येक कुटुंबातून गहू, कांदा आदी साहित्य घेऊन येऊन हा महाप्रसाद तयार केला जातो. बुधवार दि. १ रोजी गावातील साडेतीनशे कुटुंबातील महिलांनी गावात एकत्र येऊन पुऱ्या लाटण्याचे काम केले. पुरुषांनी पुऱ्या तळण्याचे, कांदा कापण्याचे काम केले, गावातील कोणीही मागे राहत नव्हते सर्व कामात व्यस्त होते. श्रीहनुमान जन्मोत्सव गुरुवार दि.२ रोजी साजरा होत असून पहाटे ह.भ.प. विलास महाराज मिंडे यांचे हनुमान जन्माचे किर्तन होणार असून आलेल्या भक्तांना पुरी व गुळवणीचा महाप्रसाद देण्यात येईल, त्यानंतर बैलगाडा शर्यती पार पडणार आहेत. तसेच शुक्रवारी संध्याकाळी सं

## विद्यार्थीप्रिय शिक्षक कांदळकर यांचे निधन



**कवठे येमाई : -** शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळदरा (कवठे येमाई) येथील विद्यार्थीप्रिय व कर्तव्यदक्ष शिक्षक आवडा बनन कांदळकर (वय ४५ वर्षे) यांचे आज पहाटे अल्पशा आजाराने खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने संपूर्ण शिक्षण क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. कांदळकर सर हे विद्यार्थ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय होते. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे व समर्पित अध्यापन पद्धतीमुळे त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवले. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले होते. विद्यार्थ्यांप्रती असलेली त्यांची जिव्हाळ्याची भावना आणि शिक्षणावरील निष्ठा त्यामुळे ते पालकांमध्ये आदरणीय ठरले होते. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या आठवणी विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या मनात कायम जिवंत राहतील, यात शंका नाही. कांदळकर सरांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,वडील व कुटुंबीय,सहकारी शिक्षक,विद्यार्थी व मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी कांदळकर सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## तीर्थक्षेत्र श्री यमाईदेवी मंदिर येथे भव्य यात्रोत्सव हनुमान जयंती उत्सव ; विविध कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** महाराष्ट्रातील तमाम भाविक भक्तांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेले शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावाचे ग्रामदैवत असलेल्या तीर्थक्षेत्र श्री येमाईदेवीची यात्रा व हनुमान जयंती उत्सव गुरुवार दिनांक २ व ३ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीने दिली आहे. हा यात्रोत्सव व वीर हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय यात्रोत्सव सोहळ्यानिमित्त गावात विविध धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

यात्रेच्या निमित्ताने पारंपरिक बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतींमध्ये प्रथम क्रमांकासाठी १ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७१ हजार



रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५१ हजार रुपये तर चतुर्थ क्रमांकासाठी २५ हजार रुपये अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच फायनल फेरीसाठी विशेष भव्य चषक देण्यात येणार असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे १५ हजार, ११ हजार व ७५०० रुपयांची अतिरिक्त बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार असून परिसरातील नामांकित मल्लांचा सहभाग अपेक्षित आहे. तसेच गुरुवारी रात्री ९ ते पहाटे ३ वाजेपर्यंत संगीतरत्न स्व. दत्ता महाडिक पुणेकर यांच्या तमाशा मंडळाच्या लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत आणखी वाढणार आहे.

याशिवाय दि. २ गुरुवारी गावठाणात आयोजित पालखी सोहळा हे यात्रेचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. या वेळी ढोल ताशा मंडळ जुन्नर यांचे आकर्षक ढोल-ताशा वादन भाविकांचे लक्ष वेधून घेणार आहे. तसेच श्री इवेंट अँड डेकोरेशन यांच्या वतीने पालखीची विनामूल्य सजावट करण्यात येणार असून सोहळ्याला अधिक भव्यता प्राप्त होणार आहे.दोन दिवस चालणाऱ्या या यात्रोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन केले आहे.

## खराडी परिसरात गार्डन व व्यायामासाठी जागा मिळण्याची मागणी

### अमृत पठारे यांचे पुणे महानगरपालिकेकडे निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** पुणे शहरातील झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे चित्र समोर येत आहे. याच पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे खराडी परिसरातील मोकळी जागा गार्डन व व्यायामासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या अमृत पठारे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

खराडी येथील नागरिक अमृत कैलास पठारे यांनी याबाबत मा. उपआयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका यांना लेखी अर्ज सादर केला आहे. या अर्जात मौजे खराडी येथील सर्वे नं. १३/१+१ अ/१६ या ठिकाणची महानगरपालिकेची मोकळी जागा नागरिकांच्या उपयोगासाठी राखीव



ठेवण्याची विनंती करण्यात आली आहे.

सदर जागा लहान मुलांसाठी खेळण्यासाठी, ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी तसेच नागरिकांना योगा व व्यायामासाठी उपयोगी पडावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या खराडी,थिटे वस्ती पुणे परिसरात अशा प्रकारच्या सार्वजनिक गार्डन किंवा व्यायामासाठी योग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः वाढत्या शहरीकरणामुळे खुल्या जागांची कमतरता भासत असून मुलांच्या शारीरिक विकासासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी गार्डनची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित जागा कायमस्वरूपी गार्डन व व्यायामासाठी राखीव करून विकसित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.यासोबतच, हा उपक्रम सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा असून सर्व नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैली साठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास अमृतताई पठारे यांनी व्यक्त केला आहे.आता पुणे महानगरपालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे खराडी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## कोठारी बिल्डरविरोधात भर उन्हात सदनिकाधारकांचे धरणे आंदोलन

### दहा दिवसात घराचा ताबा न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** निर्धारित वेळेत घराची ९५ टक्के रक्कम देऊनही गेल्या दोन वर्षांपासून घराचा ताबा दिला जात नाही. याबाबत महारेरा आणि पोलीस प्रशासनाकडे दाद मागितली असता, कारवाई करण्यात टाळाटाळ होत आहे. कष्टाच्या पैशातून हक्काचे घर घेण्याचे स्वप्न पाहत कोट्यवधी रुपये दिले, मात्र पदरी निराशा आणि बेघर होऊन जगण्यापलीकडे काही लागलेले नाही. यामुळे खराडी येथील व्हर्टीलास को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतील १०० हून अधिक सदनिकाधारकांनी आपल्या हक्काच्या घरासाठी भर उन्हात बुधवारी धरणे आंदोलन केले. दहा दिवसांत आम्हाला घराचा ताबा मिळाला नाही, तर आम्ही आत्मदहन करू किंवा इमारतीवरून उडी मारून जीव देऊ, असा निर्वाणीचा इशारा आंदोलकांनी यावेळी दिला.

आमदार बापूसाहेब पठारे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पीडितांशी संवाद साधला. तसेच खराडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत कारवाई करण्याची मागणी केली.




सदनिकाधारकांनी मांडलेल्या समस्या आणि त्यांच्या अडचणी काळजीपूर्वक ऐकून घेत, पठारे यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला केल्या. इतक्या वर्षांपासून नागरिकांना न्यायासाठी संघर्ष करावा लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे आणि याकडे दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असे ते म्हणाले. आपण सदनिकाधारकांसोबत असून, त्यांना त्यांच्या हक्काच्या घराचा ताबा मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सांगत त्यांनी आंदोलनकर्त्यांना धीर दिला.

'व्हर्टीलास सोसायटी'चे चेअरमन किशोरकुमार इंदुरे म्हणाले, ''बिल्डर अरमान कोठारी आणि सिद्धांत कोठारी यांनी जुलै २०२४ मध्ये घराचा ताबा मिळेल, असे सांगितले होते. त्यासाठी जबरदस्तीने आमच्याकडून ९५ टक्के पेमेंट वसूल करून घेतले. मात्र, दिलेल्या मुदतीला दोन वर्षे उलटून गेले, तरी अजून ताबा मिळाला नाही. जवळपास १३० सदनिकाधारकांनी प्रत्येकी १.४० कोटी रुपये याप्रमाणे २०० कोटींपेक्षा अधिक रक्कम भरलेली असतानाही प्रकल्प अपूर्ण ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी अनेकवेळा महारेरा, तसेच पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा केला. मात्र, कोणतीही ठोस कारवाई होत नाही. उलट पोलिसांकडून आम्हालाच दरडवण्यात येत आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून, मोठ्या प्रमाणावर फसवणूक आणि २०० कोटींपेक्षा अधिक मोठा आर्थिक घोटाळा असल्याचे वाटत आहे.''

**बिल्डरने ४५० कोटींचे कर्ज घेतलेय :**

व्हर्टीलास को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतील १३० सदनिकाधारकांकडून पैसे घेऊनही प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही. कोणत्याही सोयीसुविधा उभारलेल्या नाहीत. सदनिकाधारकांना ताबा दिलेला नाही. असे असतानाही कोठारी बिल्डरने सदनिकाधारकांना अंधारात ठेवत हा प्रकल्प गहाण ठेवत त्यावर ४५० कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. आमच्या कष्टाच्या पैशांवर कोठारी बिल्डर मजा करीत असून, हा घोटाळा दडपण्यासाठी कोठारी कुटुंब परदेशात पळून जाऊ शकते. त्यामुळे सरकारने वेळीच कारवाई करीत या घोटाळेबाजास परदेशात जाण्यापासून रोखावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी लक्ष घालून आम्हाला न्याय द्यावा, असे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे.

## दिवे येथे तालुका क्रीडा संकुलासाठी २ कोटींचा निधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**सासवड :** तालुक्यातील क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दिवे येथील तालुका क्रीडा संकुलासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ३१ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. शासनाने जाहीर केलेल्या निधी तालिकेनुसार पुरंदर तालुका क्रीडा संकुलासाठी २०० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे तालुक्यातील क्रीडा सुविधांचा विकास होण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत.

> पुरंदर तालुक्याला कबड्डी, व्हॉलीबॉल, कुस्ती, आर्चरीसह विविध खेळांची समृद्ध परंपरा आहे. अनेक खेळाडूंनी पोलीस व इतर शासकीय सेवांमध्ये नाव कमावले आहे. खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न केले. या निधीमुळे नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळेल, अशी प्रतिक्रिया माजी आमदार संजय जगताप यांनी दिली.

माजी आमदार संजय जगताप यांनी या निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा निधी मंजूर झाल्याची चर्चा क्रीडा क्षेत्रात होत आहे. उभारण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलामध्ये विविध खेळांसाठी आवश्यक सुविधा, धावपट्टी तसेच खेळाडूंसाठी मूलभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना सरावासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या निधीमुळे पुरंदर तालुक्यातील क्रीडा चळवळीला बळ मिळणार असून ग्रामीण भागातील युवकांना क्रीडा

# अमृता फडणवीस यांनी घेतले श्रीमंत गणपतीचे दर्शन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रतिकृती असलेल्या आणि थायलंडच्या फुकेटमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या लॉर्ड श्रीमंत गणपती बाप्पा देवालयाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी नुकतीच भेट दिली. हा दौरा अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडला असून, परदेशातील बाप्पाचे हे भव्य रूप पाहून त्या भारावून गेल्या.

फुकेटमधील हे मंदिर हुबेहूब पुण्याच्या दगडूशेठ गणपती मंदिरासारखे साकारण्यात आले आहे. परदेशात भारतीय संस्कृतीचे इतके सुंदर आणि भव्य मंदिर पाहून अमृता फडणवीस यांनी आपला आनंद व्यक्त केला. यावेळी त्यांनी बाप्पाची विधिवत आरती करून आशीर्वाद घेतले.व देवालयच्या वतीने मिस पापाचसॉर्न मीपा यांनी त्यांचा येथोचित सत्कार केला.

हे दिव्य मंदिर उभारण्यासाठी थायलंड मधील उद्योजीका मिस पापाचसॉर्न मीपा आणि गणेश भक्त चेतन लोढा (पुणे) यांनी घेतलेल्या पुढाकाराचे सौ. अमृता फडणवीस यांनी मनापासून कौतुक केले.

परदेशात आपल्या बाप्पाचे इतके भव्य आणि सुंदर मंदिर पाहून मन प्रसन्न झाले. अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून ते अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. या भेटीचा अनुभव आणि येथील कार्याचा सकारात्मक संदेश आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत नक्की पोहोचवू, असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

या दौऱ्यामुळे फुकेटमधील भारतीय समुदायामध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून, 'जय गणेश'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.





## बारामती विधानसभेसाठी राष्ट्रवादीचा प्रभाग दौरा सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** आगामी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शहरातील विविध प्रभागांमध्ये प्रभाग भेट दौऱ्याचे (घोंगडी बैठकीचे) वेळापत्रक जाहीर करण्यात आली असल्याची माहिती बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किरण इंगळे यांनी दिली. १ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान हा दौरा पार पडणार असून, नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर भर देण्यात आला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीस स्मरण करून, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार, युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार प्रभाग भेट दौऱ्याचे (घोंगडी बैठकीचे) आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये बारामती नगर परिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव, बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किरण इंगळे, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने, राष्ट्रवादी शहर कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (पी.आर.ओ ) सुरज देवकाते, बारामती नगर परिषदेचे गटनेते, उपगटनेते, सभापती, आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, सर्व सेलचे अध्यक्ष व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, प्रत्येक प्रभागात सभा, भेटीगाठी आणि संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विविध भागांमध्ये जाऊन स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, तसेच पक्षाची भूमिका आणि विकासाची दृष्टी स्पष्ट करणे, हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. असा असणार आहे प्रभाग भेट दौरा....१ एप्रिल रोजी भैरवनाथ मंदिर तांदुळवाडी , बौद्ध विहार, राम मंदिर राम गल्ली, सावित्रीबाई फुले सभागृह पान गल्ली, परिसरात प्रभाग भेट दौऱ्याची सुरुवात होणार आहे. त्यानंतर २ एप्रिल रोजी, राष्ट्रवादी भवन कसबा, मोरया नगर ओपन स्पेस गणपती मंदिर शेजारी, अवचट इस्टेट गणपती मंदिर शेजारी, अनंत फ्लावर गार्डन माऊली नगर, शुक्रवार ३ एप्रिल रोजी महात्मा फुले समाज मंदिर पाटस रोड, क्षेत्रीय कार्यालय टकार कॉलनी, तांदुळवाडी वेस चौक विठ्ठल मंदिर शेजारी, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर होलार समाज मंदिर, शनिवारी ४ एप्रिल रोजी पिडीसी बँक जवळ सेफी वुमन शेजारी, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालय शारदा प्रांगण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत ओपन स्पेस, बुरुड हाउसिंग सोसायटी समाज मंदिर, बौद्ध विहार सिद्धार्थनगर, रविवार ५ एप्रिल रोजी खंडोबा नगर चौक, जामदार रोड, राष्ट्रवादी भवन कसबा, माळेगाव कॉलनी दत्त मंदिर, मंगळवार ७ एप्रिल रोजी महिला सोसायटी ओपन स्पेस, सूर्यनगरी ओपन स्पेस, गावठाण काळेश्वर मंदिर जळोची, देसाई इस्टेट गणपती मंदिर, श्री गणेश मंदिर कांचन नगर, रुई गाव मारुती मंदिर, बुधवार ८ एप्रिल रोजी सिद्धिविनायक मंदिर अशोक नगर, दत्त मंदिर कृषी देवता नगर, दत्त मंदिर वसंत नगर, अशोक नगर गणपती मंदिर, या ठिकाणी बारामती शहर राष्ट्रवादी पार्टीच्या वतीने प्रभात भेट दौरा (घोंगडी बैठक) पार पडणार आहे .

# हवेली तालुक्यात 'उल्हास' साक्षरतेचा जागर; २०३५ नवसाक्षरांनी दिली परीक्षा

## गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान यशस्वी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**हवेली:** 'साक्षर भारत, समर्थ भारत आणि संपन्न भारत' हे ब्रीद उराशी बाळगून केंद्र सरकार पुरस्कृत 'उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत' पंचायत समिती हवेली शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित पायाभूत साक्षरता मूल्यमापन चाचणी उत्साहात पार पडली. तालुक्यातील १६६ शाळांमध्ये झालेल्या या परीक्षेत एकूण २०७८ असाक्षरांपैकी २०३५ नागरिकांनी सहभाग नोंदवत साक्षरतेच्या दिशेने पाऊल टाकले, अशी माहिती हवेलीचे कार्यक्षम गटशिक्षणाधिकारी. हेमंतकुमार खाडे यांनी दिली. सर्वेक्षणातून शोधले २०७८ असाक्षर सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात १५ ते ६५ वयोगटातील असाक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण शिक्षकांमार्फत करण्यात आले होते. यामध्ये तालुक्यात २०७८ असाक्षर आढळले. वर्षभर स्वयंसेवकांच्या मदतीने या नागरिकांना केवळ वाचन, लेखनच नव्हे, तर डिजिटल साक्षरता, वित्तीय साक्षरता, आहार-आरोग्य, मतदान आणि कायदेविषयक माहिती यांसारखी जीवनोपयोगी कौशल्ये शिकवण्यात आली. या उपक्रमात तालुक्यातील सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, विषय तज्ञ, विशेष शिक्षकआणि तंत्रस्नेही शिक्षकांनी हिरीरीने सहभाग घेतला. ''तालुक्याचा साक्षरतेचा आलेख उंचावण्यासाठी प्रयत्न करत पुणे जिल्ह्यामध्ये हवेली तालुक्यात सर्वात जास्त असाक्षर परीक्षेसाठी प्रविष्ट झाले.या मुळे साक्षर होण्याचे प्रमाण वाढले असल्याने प्रयत्न करणाऱ्या सर्व घटकांचे अभिनंदन पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे,उपसभापती विद्याताई गायकवाड, गटविकास अधिकारी शेखर शेलार यांनी अभिनंदन केले, महिलांचा उत्स्फूर्त सहभाग : २९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत



तालुक्यातील १६६ शाळांमध्ये परीक्षा केंद्रे उभारण्यात आली होती. एकूण २०७८ असाक्षरांमध्ये १६४२ स्त्रिया व ४३६ पुरुष होते. प्रत्यक्ष परीक्षेला १६०३ स्त्रिया व ४३२ पुरुष हजर राहिले. परीक्षेचा निकाल त्याच दिवशी तयार करून 'उल्हास पोर्टल'वर ऑनलाइन गुण भरण्याचे काम शिक्षकांनी युद्धपातळीवर पूर्ण केले.

प्रशासकीय यंत्रणेचे नियोजन : हे अभियान यशस्वी करण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी (योजना) डॉ. भाऊसाहेब कारेकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे व गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विषय साधन व्यक्ती अनुराधा क्षीरसागर यांनी कामकाज पाहिले. त्यांना तंत्रस्नेही शिक्षक राजेश धायबर, सचिन खंदारे व उमेद धावारे यांनी सहकार्य केले.

ठळक वैशिष्ट्ये:

एकूण नोंदणी: २०७८ रीक्षेला उपस्थित: २०३५
महिला परीक्षार्थी: १६०३ पुरुष परीक्षार्थी: ४३२
परीक्षा केंद्रे: १६६ शाळा

द • ख • ल

## अहिल्यानगर येथे प्रहार दिव्यांग संघटनेचे कार्यकर्ता शिबिर उत्साहात

**लिंपणगाव** : प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग क्रांती संघटना यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय पदाधिकारी व कार्यकर्ता कार्यशाळा २९ व ३० मार्च रोजी उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस माजी मंत्री मा. बच्चू कडू यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या प्रसंगी प्रहार करिअर अकॅडमीच्या नवीन वास्तूचे उद्घाटन व नामकरण बच्चू कडू यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बच्चू कडू यांनी संघटन बळकटीसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

श्रीगोंदा तालुक्यात प्रहार दिव्यांग संघटनेचे संघटन वेगाने वाढत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यावेळी कार्यकर्त्यांच्या वतीने शंभर किलो लाडू व फरसाण देण्यात आल्याने बच्चू कडू यांनी राजेंद्र पोकळे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांच्या कार्याचे विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमाला राजेंद्र पोकळे, मच्छिंद्र पाटोळे, शशिकांतजी आंधळकर, नानासाहेब कोळपे, डॉ. सोमनाथ देवकाते, शिराज शेख, बाबा घोडके, वायदंडे, बाळासाहेब पिपाडा, रियाज शेख, अमोल भागवत, गणेश कळसकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेमुळे संघटनेतील पदाधिकाऱ्यांना दिशा व प्रेरणा मिळाली असून पुढील कार्य अधिक जोमाने करण्यासाठी सर्वांनी निर्धार व्यक्त केला.

## आरपीआय (गवई) ची नव्याने कार्यकारिणी जाहीर

**अहिल्यानगर** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाची शहरातील महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच उत्साहात पार पडली. या बैठकीत शहराची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के व महिला आघाडीच्या ज्योतीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. शहर, उपनगर तसेच नगर तालुक्यातील कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बैठकीत बोलताना सुशांत म्हस्के यांनी सांगितले की, काही महिन्यांपूर्वी पक्षाची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर जुने व नवीन कार्यकर्ते यांचा समन्वय साधत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून संधी देण्यात आली असून, पक्ष हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून सर्व जाती-धर्माला सोबत घेऊन वाटचाल करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

नवीन पदाधिकाऱ्यांना एका वर्षाचा कार्यकाळ देण्यात आला असून, त्यांनी प्रभावी काम करून पक्षविस्तार करावा व अधिकाधिक कार्यकर्ते जोडावेत, असे आवाहन करण्यात आले. समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय किंवा अत्याचार झाल्यास पक्ष त्याविरोधात आवाज उठवून न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही म्हस्के यांनी नमूद केले. सध्या जाती-धर्मात भांडण लावण्याचे राजकारण सुरू असून, अशा परिस्थितीत पक्षाची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

लवकरच जिल्हाव्यापी मेळावा आयोजित करण्यात येणार असून, या मेळाव्यासाठी पक्षप्रमुख राजेंद्र गवई उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

## जगदंब फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद-शालिनीताई विखे

**अहिल्यानगर** : जगदंब फाउंडेशन एकल महिलाच्या पुनर्विवाहासाठी व इतर विषयासाठी करत असलेले कार्य खूप कौतुकास्पद आहे, असे उद्गार अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा ना. शालिनीताई विखे यांनी लोणी येथील वधू वर मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी काढले. जगदंब फाउंडेशन संचलित आणि महाराष्ट्रातील नंबर १ ची विश्वसनीय वधू-वर सूचक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'मराठा सोयरीक संस्था' यांच्या वतीने हायटेक मेळावा लोणी मध्ये पार पडला. हा मोफत १०६ वा मेळावा मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी लोणी खुर्द येथील वरद विनायक सांस्कृतिक भवन येथे भव्य स्क्रीनवर मुला मुलींचे फोटो बायोडाटा दाखवून आधुनिक पद्धतीने संपन्न झाला. या मेळाव्याचे प्रमुख पाहुणे आणि उद्घाटन मा. ना. सौ. शालिनीताई विखे पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्षा (अ.नगर) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वरद विनायक देवस्थानचे मठाधिपती ह.भ.प. श्री. उद्धव महाराज मंडलिक , जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष श्री गणेश शिवाजी लंघे, माणिक शिवराम धनवटे (धनवटे बिल्डर्स अँड डेव्हलपर्स) तसेच के के मॅनेजमेंट सोल्युशनचे संचालक कमलेश कोते यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

## गुरु धाम व शक्तिधाम येथे कुमारी पूजनासह धार्मिक कार्यक्रम उत्साहात

**अहिल्यानगर** : चैत्र नवरात्राच्या पावन पर्वात अष्टमीच्या दिवशी रामनवमीचे आगमन झाल्याने येथील गुरु धाम व शक्तिधाम येथे विविध धार्मिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. विशेषतः कुमारी पूजनाला यावेळी केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून, भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत हा सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षणांपैकी कुमारी पूजन हा सोहळा ठरला. समाजातील लहान मुलींना देवीस्वरूप मानून त्यांचे पूजन करण्यात आले. यामध्ये अनेक कुमारींचा उत्स्फुर्त सहभाग दिसून आला. पारंपरिक पद्धतीने त्यांच्या पाय धुऊन, ओवाळून आणि सन्मानपूर्वक त्यांना प्रसाद देण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये भक्तिभाव आणि सामाजिक समतेचा संदेश अधोरेखित झाला.

# उन्हाची तीव्रता वाढली; पशुधनावर उष्माघाताचा धोका



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : यंदाच्या उन्हाळ्यात तापमानाने लवकरच आक्रमक रूप धारण केले असून, सरासरीपेक्षा १ ते २ अंश सेल्सियसने वाढलेल्या उष्णतेचा थेट परिणाम पशुधन व कुक्कुट पक्ष्यांवर होत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघात (हीट स्ट्रोक) व उष्णलहरींचा धोका निर्माण झाला असून, पशुधन आजारी पडणे किंवा दगावण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे जनावरांची पक्षाची काळजी घेण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे .

तज्ज्ञांच्या माहितीनुसार, सलग तीन दिवसांपेक्षा अधिक काळ तापमान सरासरीपेक्षा जास्त राहिल्यास उष्णलहरीची स्थिती निर्माण होते. अशा वेळी जनावरांच्या शरीरातील पाणी व क्षारांचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरण (डिहायड्रेशन) होते. परिणामी जनावरांचे खाद्य सेवन कमी होते आणि उत्पादन क्षम तेवर विपरीत परिणाम होतो.लहान वासरे, करडे, गडद रंगाचे प्राणी, श्वसनाच्या आजाराने त्रस्त जनावरे, दुभती जनावरे तसेच कुक्कुट पक्षी यांना उष्माघाताचा विशेष धोका असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.त्यामुळे जनावरांची काळजी घेण्याचे गरज निर्माण झाली आहे. आज उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही उष्माघाताची प्रमुख लक्षणे अशी असतात त्यामध्ये जनावरांना धाप लागणे, श्वासाचा वेग वाढणे, जास्त पाणी पिणे, चारा कमी खाणे, सुस्ती, लाळ गाळणे, नाकपुड्या कोरड्या पडणे व शरीरातील पाणी-क्षारांचे प्रमाण कमी होणे.

आशिया लक्षणे असतात त्यापासून बचावासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे त्यासाठी जनावरांना थंड वातावरणात अचानक उष्णतेत नेणे टाळावे. सकाळ व सायंकाळच्या थंड वेळेतच चरायला सोडावे. उष्ण काळात सावलीत किंवा हवेशीर ठिकाणी ठेवावे. तसेच पुरेशा प्रमाणात स्वच्छ पाण्याची उपलब्धता ठेवावी.तरीही लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधून उपचार करून घ्यावेत, असे आवाहन पशुसंवर्धन विभागानचे सहाय्यक आयुक्त गोरख सातकर यांनी केले आहे.

## प्रशांत ओगले यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील रहिवाशी व श्रीगोंदा बाजार समितीचे संचालक प्रशांत भैय्या ओगले यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून निवडीनंतर त्याच्यावर तालुक्यातून सर्वत्र आनंद व्यक्त होत होताना दिसत आहे.

मुळचे हे पेडगाव येथील रहिवाशी असलेले तसेच श्रीरामपूर येथील आमदार हेमंत ओगले यांचे बंधू श्रीगोंदा बाजार समितीचे संचालक प्रशांत भैय्या ओगले यांनी तालुक्यासह संपूर्ण राज्यात नेहमी सामाजिक, राजकीय आणि युवकांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यातून अनेकांना न्याय मिळाला आहे तसेच अन्यायाच्या विरोधात त्यांनी नेहमीच एल्गार उगारला आहे त्यामध्ये शेतकऱ्यांचे विविध प्रश्न ,व्यापारी वर्गाचे प्रश्न , विद्यार्थी वर्गाचे प्रश्न यासारख्या विविध प्रश्नावर नेहमी आंदोलने उपोषणे करून प्रश्नाचे लक्ष वेधून जनतेला न्याय मिळवून दिला आहे त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या निवडीमुळे श्रीगोंदा तालुक्याच्या राजकीय क्षेत्राला नवे बळ मिळणार असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरातून व्यक्त होत आहे.या निवडीबद्दल अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. युवकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि संघटन मजबूत करण्यासाठी ओगले यांचे नेतृत्व निश्चितच प्रभावी ठरेल, असा विश्वास जनतेमधून व्यक्त केला जात आहे.

## जादूटोणा व भोंदूगिरीविरोधात कडक कारवाईची मागणी; तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव** : शेवगाव तालुक्यात वाढत्या भोंदूगिरी व जादूटोण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शेवगाव तालुका व अहमदनगर जिल्हा यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे राज्यात काही ठिकाणी भोंदू बाबा, देवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष व अध्यात्माच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक, मानसिक छळ तसेच महिलांचे शोषण होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशा प्रकारांमुळे समाजात अंधश्रद्धा वाढीस लागून गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर समितीने तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत.

पहिली, जादूटोणा व अंधश्रद्धा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक पोलीस ठाण्यात 'अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष' स्थापन करावा.

दुसरी, भारतीय राज्यघटनेत नमूद केलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी शाळा, महाविद्यालये व समाजपातळीवर जनजागृती कार्यक्रम राबवावेत. तसेच जिल्हास्तरीय प्रचार-प्रसार समितीची बैठक घेऊन या उपक्रमांना गती द्यावी.

तिसरी, भोंदूगिरी, फलज्योतिष, चमत्कार यांच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी.

सदर मागण्यांचा गांभीर्याने विचार करून प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर बबनराव धावणे, चिमाजी धनवडे , विठ्ठल सोनवणे, बाबासाहेब फलके, सविता लोंढे, संजय लड्डा, वसंत जगधने, दिलीप फलके, गणेश चेके,मोतिलाल बन्सवाल, किसन माने, भागनाथ काटे यांच्या साह्या आहेत.




## सेवानिवृत्त शिक्षकांचा भावपूर्ण गौरव

**टाकळी ढोकेश्वर** : अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या दोन ज्येष्ठ शिक्षकांचा सेवापूर्ती गौरव समारंभ बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. विद्यालयाचे सन्माननीय सेवक मा. प्रा. विजय दत्तात्रय सोबले व मा. श्री. मल्हारी केरु वाघस्कर (सर) हे ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या दीर्घकाळीन समर्पित सेवेचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला संस्थेच्या उच्च पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शवली.

## हनुमान जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहिल्यानगर** : हनुमान जयंतीच्या पावन निमित्ताने अष्टविनायक ब्लड बँक व हनुमान मंदिर लक्ष्मी कारंजा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ६५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. धार्मिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देणारा हा उपक्रम ठरला.

शिबिराचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. अष्टविनायक ब्लड बँकेच्या तज्ज्ञ पथकाने रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षितरीत्या रक्तसंकलन केले. रक्तदात्यांना आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांच्यात समाधानाचे वातावरण दिसून आले.

या उपक्रमात अष्टविनायक ब्लड बँकेचे नरेंद्र मेरगू, जितेंद्र पलीकुंडवार, वनिता श्रीपत, नलिनी मुसळे, समीक्षा टाके, वंदना देसाई आणि गुलाब शेख यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच मंडळाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

हनुमान जयंतीसारख्या पवित्र दिवशी रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविल्याने नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण झाली. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करून गरजू रुग्णांना मदत करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

## आदर्श गाव वाघोलीत १००% घरपट्टी व पाणीपट्टी वसुली : सरपंच सुस्मिता भालसिंग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**शेवगाव** : गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक शिस्त आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरतो, याचे उत्तम उदाहरण आदर्श गाव वाघोली येथे पाहायला मिळाले आहे. ग्रामपंचायतीच्या प्रभावी नियोजनामुळे गावात घरपट्टी व पाणीपट्टीची ३१ मार्च अखेर १०० टक्के वसुली करण्यात यश आले आहे.

याबाबत माहिती देताना सरपंच सुस्मिता भालसिंग यांनी सांगितले की, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे. घराघरात जाऊन जनजागृती करण्यात आली, तसेच थकीत कर भरण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद देत वेळेत १५४८००/- येवढा कर भरून ग्रामविकासात सहभाग नोंदवला.

या १०० टक्के वसुलीमुळे ग्रामपंचायतीला विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होणार असून, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांच्या कामांना गती मिळणार आहे. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, वाघोली गाव इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ३२ लाख रुपये नफा : आ.काशिनाथ दाते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पारनेर** : मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ पारनेर ग्रामीण पतसंस्थेला सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षात रुपये ५ कोटी ३२ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली. संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर २५१ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे खेळते भांडवल २९५ कोटी ५२ लाख असुन वसूल भाग भांडवल ६ कोटी ५४ लाख, राखीव व इतर निधी २९ कोटी ८३ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप १७५ कोटी २९ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये १०६ कोटी ९९ लाख आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये २४८० कोटींची झालेली आहे.

संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे (नवी मुंबई) खडकवाडी, आळेफाटा, सुपा व शिरूर येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अध्यावत इमारती आहेत. पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा ता. जुन्नर, सुपा, कामोठे (नवी मुंबई), वनकुटे, अहिल्यानगर, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई आहे. संस्थेमार्फत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, जामगाव, ढवळपुरी व बेलवंडी फाटा येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थेच्या अद्यावत कोर बँकिंग, मोबाईल बँकिंग, एस एम एस सुविधांमुळे ग्राहकांना सर्व माहिती तात्काळ मिळत आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरक कंपनीचे अधिकृत वीज बिल भरणा केंद्र, आर.टी.जी.एस व एन.ई.एफ.टी सुविधा सुरू करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांनी सांगितले.

# भगवानगडाच्या नारळी सप्ताहाच्या प्रारंभास पुरणपोळीचा महाप्रसाद

## पुरुषांच्या बरोबरीनेच महिलाही भावीकांच्या सेवेत तल्लीन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**खरवंडी कासार** : पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे संत भगवान बाबाच्या नारळी सप्ताहाच्या प्रारंभास बडेवाडी येथे येणाऱ्या सर्व भाविकांना पुरणपोळी चा महाप्रसाद देऊन ज्ञानदानाच्या मंडपातच अन्नदानाचा ही स्वाद दिला

बडेवाडी गाव एकदम छोटे गाव आहे तरीही त्यांनी विस वर्षा पूर्वी श्रीक्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहाचे नारळ घेतले तेव्हा पासून त्यांनी आपल्या गावात होणाऱ्या नारळी सप्ताहाच्या साठी लागणारे आर्थिक खर्चाचे नियोजन केले त्यामुळे त्यांनी गाव छोटे असले तरी गावातील माणसाचे मण हे गावाच्या नावाप्रमाणेच बडे असल्याचे दाखवून दिले

भगवान गडाचे महंत डॉ नामदेव शास्त्री यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे भगवानगडाच्या शिस्ती प्रमाणे येळेश्वर संस्थांनचे महंत रामगीरी महाराज व बडेवाडी

गावातील पुरुष प्रमाणेच गावातील महिलाही गडाच्या सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांना जास्तीत जास्त चांगली सेवा देण्यासाठी तत्पर असल्याची त्यांनी सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी दाखवून दिले प्रत्येक घरात सकाळीच चूल पेटवून त्यावर पुरणपोळी तयार केली येणाऱ्या भावीकाना तृप्त केले बडेवाडी बोंदरवाडी .आणि येळी अशा तिन गावातिल प्रत्येक घरामध्ये एक हजार पुरणपोळी तयार करून एक लाख पुरण पोळी व आमटी तयार करत वाजत गाजत सप्ताह स्थळी घेऊन येत येणाऱ्या भावीकाना पुरणपोळी चा महाप्रसादाचे वाटप करण्यात आले



त्याचप्रमाणे गावातील महिलांनी येत्या सात दिवसात येणाऱ्या भाविकांची जास्तीत जास्त सेवा करण्याचा संकल्प केला आहे उन्हाळ्याचे दिवस असल्याने येणाऱ्या भाविकांना बसल्या जागेवर पाणी वाटपाची काम हे महिला मंडळ करत आहे गावातील प्रत्येक घरातील वयोवृद्धापासून ते लहान मुलापर्यंत सर्वजण वेगवेगळ्यावयोगटातील व्यक्तींना कामाचे वाटप करून दिले असते घरात पुढची दिवाळी दसरा याप्रमाणे सर्वांनी या सप्ताहाचे यज्ञा मध्ये सहभाग घेतला होता.

### गाव छोटं पण मन मोठं असणाऱ्या बडेवाडीला सहकार्य करा : महंत डॉ.नामदेव शास्त्री भगवानगड

श्री क्षेत्र भगवानगडाचा नारळी सप्ताह पार पडत असलेले बडेवाडी हे गाव मनाने आणि श्रद्धेने खूप मोठे आहे. परंतु लोकसंख्येने अत्यल्प असल्यामुळे सप्ताहासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची जेवणाची गैरसोय होऊ नये म्हणून परिसरातील सर्व गावांनी आलेल्या भाविकांना जेवण वाढण्यासाठी मदत करावी तसेच बडेवाडी गावाला सहकार्य असे आवाहन ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री यांनी केले.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.२ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८



श्रीरामपूर शहरातील रेल्वे स्टेशन जवळील श्री हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा होत असून त्यानिमित्त हनुमान मंदिरावर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली.
**(छाया - सुनील पांढरे)**

# तरुणाची घराच्या पडवीत गळफास घेऊन आत्महत्या



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील चांदेगाव येथे एका तरुणाने राहत्या घराच्या पडवीत दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. धनंजय सखाहरी भांड (वय ३४, रा. चांदेगाव ता. राहुरी) असे मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय भांड यांनी आपल्या राहत्या घरामध्ये पडवीत गळफास घेत आत्महत्या केली. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच चांदेगावचे पोलीस पाटील संतोष खर्डे तसेच बाबासाहेब भांड, शरद भांड, बाबू भांड, मयूर कुठुळे आणि संदीप भांड यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.राहुरी पोलिसांनी आकस्मत मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलिस करीत आहे.

# श्रीरामपूरची शांतता व सलोखा अबाधित ठेवा : एस.पी. घार्गे यांचे आवाहन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : रामनवमी यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात घडलेल्या काही घटनांच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी श्रीरामपूर शहराला भेट देत विविध समाजघटकांशी संवाद साधला.

शहराची शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. शहरातील हिंदू व मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींशी स्वतंत्र बैठका घेत घार्गे यांनी परस्पर संवाद वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

श्रीरामपूर हे सर्वधर्मीयांच्या सलोख्यासाठी ओळखले जाणारे शहर आहे. काही घटना घडल्या तरी त्याचा व्यापक परिणाम होऊ नये, यासाठी सर्वांनी संयम राखावा, असे त्यांनी स्पष्ट केले. मुस्लिम समाजाच्या बैठकीत त्यांनी व्यापारी व नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिंता दूर करण्यासाठी पोलीस प्रशासन सतर्क असल्याचे सांगितले. तसेच स्थानिक पोलिसांनी नियमितपणे नागरिकांमध्ये जाऊन त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात, असे निर्देश दिले. दर पंधरा दिवसांनी शहराला भेट देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. बैठकीत विविध मान्यवरांनीही आपली मते मांडली. व्यसनाधीनतेवर नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात, तसेच जमावबंदीच्या घटनांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

या प्रसंगी व्यापारी, वकील, डॉक्टर, समाजसेवक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवार यांनी प्रास्ताविक केले, तर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी आभार मानले.

# श्रीरामपूर उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : पुणे येथील दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडून या प्रणालीसाठी आवश्यक युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर रुग्णालयांमध्ये दिव्यांग बोर्डातील तज्ञ डॉक्टरांमार्फत रुग्णांची तपासणी करून त्यांना प्रमाणपत्रे वितरित केली जातील. त्यानुसार श्रीरामपूर येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र प्रणाली उपलब्ध होणार आहे. प्रशासनाने रुग्णांच्या सोयीसाठी तालुकानिहाय दिवस निश्चित केले आहे अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहता, व श्रीरामपूर येथील रुग्णासाठी उपजिल्हा रुग्णालय श्रीरामपूर येथे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या नव्या सुविधेमुळे दिव्यांग बांधवांची होणारी हेळसांड थांबविण्यास मदत होणार असून, संबंधित तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी आपल्या जवळच्या आरोग्य संस्थेत उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# सावकाराच्या जाचास कंटाळून एकाची आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : सावकाराच्या जाचास कंटाळून वडगाव तनपुरा (ता.कर्जत) येथील एकाने आपली जीवनयात्रा संपवली आहे. संजय पांडुरंग शहाणे असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव असून याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात चार जणांच्या विरोधात मयताच्या पत्नीच्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत संजय शहाणे घरी असताना आरोपी अशोक राऊत आणि त्यांच्या सोबत इतर तीन जण घरी येत तू आमच्याकडून व्याजाने घेतलेले दीड लाख रुपये आताच्या आता दे. अन्यथा तुला उचलून घेवून जाऊ अशी धमकी देत निघून गेले. सोमवार, दि ३० मार्च रोजी पुन्हा घरी येत तुला दिलेली मुदत संपली असून तू आमचे पैसे अजून पण दिले नाही म्हणत तुला जीवेच मारून टाकतो असे म्हणाल्याने संजय हा घरा बाहेर पडला. व्याजाच्या पैशाला होणारा जाच आणि सावकाराच्या शारीरिक व मानसिक छळास कंटाळून संजय शहाणे याने वडगाव तनपुरा शिवारातील आंब्याच्या झाडास गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. याबाबत मयताची पत्नी अश्विनी संजय शहाणे यांच्या फिर्यादीवरून चौघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अशोक राऊत (भांडेवाडी ता. कर्जत) यास कर्जत पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेतील उर्वरित तीन आरोपी फरार असून कर्जत पोलीस विभाग त्यांच्या मागावर आहेत. घटनास्थळी पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, प्रभारी पोलीस निरीक्षक विजय झंझाड़ यांनी भेट दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोऱ्हाडे सदर घटनेचा अधिक तपास करीत आहे.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका

## एक ताब्यात, तिघे फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : अहिल्यानगर जिल्ह्यात कत्तलीसाठी नेण्यात येत असलेल्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून, या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे, तर तिघे आरोपी फरार आहेत. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील अवैध गोवंश वाहतूक व कत्तल रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने श्रीगोंदा तालुक्यात पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त बातमीच्या आधारे काष्टी-श्रीगोंदा मार्गावर सापळा रचला. दि. ३० मार्च २०२६ रोजी रात्री एक पिकअप वाहन अडवून तपासणी केली असता, त्यामध्ये ५ गोवंशीय जनावरे आढळून आली. वाहनचालक सोहम यशवंत टिळे (वय २१, रा. टिळेवाडी, ता. दौंड, जि. पुणे) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने ही जनावरे कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली.

या प्रकरणात ओंकार दशरथ सायकर (रा. राहु, ता. दौंड), हिम्मत कुरेशी (रा. धाराशिव) व शोएब ताहेर कुरेशी (रा. खडकत, ता. आष्टी, जि. बीड) हे आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी २ लाख १० हजार रुपये किमतीची ५ जनावरे, ५ लाख रुपये किमतीचे महिंद्रा पिकअप वाहन (एमएच-२३ एयू ००४३) आणि २० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण ७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) तसेच प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# नवीन घरात झोपायला गेले अन् चोरट्यांनी जुने घर फोडले

## ४ लाखांची चोरी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील घुमनदेव येथील मुठेवाडगाव रोडवर वादळी पावसामुळे शेजारीच बांधलेल्या नवीन घरात झोपायला गेलेल्या दाम्पत्याचे जुने घर फोडून तब्बल सव्वा चार लाखांचा ऐवज चोरून नेले. तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील घुमनदेव येथील मुठेवाडगांव रोडवर नथुराम भिकाजी जाधव, यांनी आपले जुने घर असून घराच्या शेजारी नवीन घर बांधले आहे. अद्याप आपण त्यात रहावयास गेले नव्हते. मात्र. सोमवारी सायंकाळी वादळी पाऊस सुरू झाल्याने जेवण करून जाधव व त्यांची पत्नी जाईबाई नव्या घरात झोपायला गेले. तत्पूर्वी जुन्या घराच्या पडवीचा दरवाजा बंद करून त्याला कुलूप लावले होते. मध्यरात्री १.४५ ला कुत्रे भुंकण्याचा आवाज आल्याने बाहेर येवून पाहीले असता लाईट नसल्याने काही दिसले नाही म्हणून ते पुन्हा झोपायला गेले. सकाळी ६.३० ला उठल्यानंतर जुन्या घराकडे जाधव गेले असता पडवीच्या दरवाजाचे कुलूप कोंड्याला लटकलेले दिसले. त्यामुळे तुटलेला दरवाजा दिसल्याने घरात जावून पाहीले असता घरात उचकापाचक केलेली आढळून आली तसेच भिंतीच्या खिळ्याला लटकवलेली पिशवी बारकाईने पाहीली असता त्यातील २ लाख ४० हजारांची मोहनमाळ, १ लाख ६० हजारांचे मंगळसूत्र, २४ हजारांची नथ, ३ हजारांची रोकड असा ४ लाख २७ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे लक्षात आले. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात नथुराम भिकाजी जाधव, यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# श्रीरामपूरमध्ये खासगी शाळेकडून फीसाठी पालकांवर सक्ती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शाळेचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले नाही, तोच शहरातील एका खासगी इंग्रजी शाळेकडून पालकांवर पुढील वर्षाची शालेय फी भरण्याची सक्ती केली जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

फी भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्य दिले जाणार नाही, अशी आडमुठी भूमिका शाळा प्रशासनाने घेतल्यामुळे पालकवर्गात संतापाची लाट उसळली आहे. या शाळेने पालकांना नोटीस पाठविली. यात पुढील शैक्षणिक वर्षाची फी निकालाच्या दिवशीच भरण्याची ताकीद दिली होती. फी न भरल्यास विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या तसेच इतर आवश्यक साहित्य देण्यात येणार नाही, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, सध्याच्या आर्थिक परिस्थितीत शैक्षणिक वर्ष संपले नाही, तोच पुढील वर्षाची फी ची एकरकमी मोठी रक्कम भरणे अनेक कुटुंबांसाठी कठीण आहे. अनेक पालकांनी शाळा सुरू झाल्यानंतर टप्प्यात फी भरण्याची मागणी शाळा प्रशासनाकडे केली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. तसेच, फी भरल्याशिवाय पुस्तके न देण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्कावर गदा आणणारा असल्याचेही पालकांचे म्हणणे आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पुस्तके मिळाली नाहीत, तर मुलांचा अभ्यास मागे राहतो.

याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो, असेही काही पालकांनी सांगितले. दरम्यान, शासनाने वेळोवेळी शाळांनी फीसंदर्भात पारदर्शकता ठेवावी तसेच पालकांवर अनावश्यक आर्थिक बोजा टाकू नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तरीही काही शाळांकडून या नियमांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. या प्रकरणी शिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थितीची चौकशी करावी, अशी मागणी पालकांकडून जोर धरत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि पालकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा पालकांनी दिला आहे.

# खुनाच्या गुन्ह्यात मुलाला जन्मठेप

## वडिलास १० वर्षे तुरुंगावास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : मागील भांडणाचा राग धरून खून केल्याप्रकरणी राहुल काळे याला जन्मठेप, त्याचे वडील देविदास काळे याला १० वर्ष साधी कैद, रामनाथ गायकवाड याला १० वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. इतर दोघांविरुद्ध सबळ पुरावा नसल्याने त्यांना निर्दोष मुक्त करण्यात आले. या प्रकरणाचा निकाल सोमवारी (ता.३०) येथील अतिरिक्त सह जिल्हा न्यायालय आणि अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. बी. गव्हाणे यांनी दिला.

या खून प्रकरणी राहुल आणि वडील देविदास काळे या बापलेकाला शिक्षा झाली आहे. मागील भांडणाचा राग मनात धरून वडील आणि मुलावर चाकूने वार झाल्याची घटना २२ जून २०२० मध्ये घडली होती. बाळासाहेब चत्तर (रा. कौठे कमळेश्वर, ता. संगमनेर) यांचा उपचारादम्यान मृत्यू झाला होता. त्यांचा मुलगा प्रतीक जखमी झाला होता.

त्यांनी दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी राहुल काळे, देविदास काळे आणि रामनाथ गायकवाड (सर्व रा. वडगाव पान, ता. संगमनेर) आणि इतर दोघे अशा पाच जणांविरोधात संगमनेर तालुका पोलिसांत गुन्हा दाखल केला होता. तालुका पोलिस ठाण्यातील तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक पी. वाय. कादरी यांनी तपास करत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सरकारी वकील जयंत दिवटे यांनी एकूण १५ साक्षीदार तपासले. सहायक पोलिस निरीक्षक कादरी आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप कचेरिया यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली.

# कोल्ही घाटात अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर** : तालुक्यातील कोल्ही घाटात बुधवारी दूपारी एक वाजेच्या सुमारास झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घ टना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कोल्ही गावातील प्रदीप परसराम मगर (वय ४७) हे आपल्या दुचाकी क्रमांक एमएच १५ जीआर ७६५८ वरून कोल्ही गावाकडून वैजापूरच्या दिशेने जात होते. दरम्यान, कोल्ही घाटात एक इको वाहन रस्त्यात बंद पडलेले होते. अचानक समोर आलेल्या या वाहनाला मगर यांच्या दुचाकीची जोरदार धडक बसली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मगर यांना तत्काळ वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. मृत प्रदीप मगर यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. पूढील तपास पोलीस हवालदार किशोर आघाडे करीत आहेत.

# कुकडी डाव्या कालव्यात पडून दाम्पत्याचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जुन्नर** : तालुक्यातील येडगाव धरणाच्या कुकडी डाव्या कालव्यात पडून उंब्रज येथील अक्षय यशवंत शिंगोटे (वय २८) आणि प्राजक्ता अक्षय शिंगोटे (वय २५) या दाम्पत्याचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेनंतर सुमारे ४० तासांनी, बुधवारी (१ एप्रिल) सकाळी दहा वाजता लेंडेस्थळ येथे दोघांचेही मृतदेह आढळून आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काळवाडीच्या दिशेने जाणाऱ्या कालव्याच्या पुलाजवळ काही नागरिकांना एक लहान बालक कालव्याच्या कडेला उभे राहून आई-वडिलांना हाका मारताना दिसले. नागरिकांनी तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली असता तेथे चप्पल आढळून आली. कालव्याकडे लक्ष दिल्यावर संबंधित दाम्पत्य पाण्याच्या प्रवाहात वाहून जात असल्याचे दिसून आले. या घटनेची माहिती मिळताच आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव आणि त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. श्रीगोंदा तालुक्यातील विसापूरपर्यंत शोध मोहीम राबविण्यात आली. बोटीच्या सहाय्याने शोधकार्य सुरू ठेवण्यात आले. मात्र, कालव्यातील तीव्र प्रवाहामुळे अडचणी निर्माण झाली. उंब्रज आणि काळवाडी गावचे सरपंच हिरामण शिंगोटे, तुषार वामन, उंब्रजचे पोलीस पाटील राहुल हांडे आणि ग्रामस्थांनी पाटबंधारे विभागाकडे कालव्यातील पाणी कमी करण्याची मागणी केली. आळेफाटा पोलीस ठाण्याकडूनही याबाबत पत्र देण्यात आले. ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेनंतर अधिकाऱ्यांनी थोड्या कालावधीसाठी पाणी बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जुन्नर येथील शिवनेरी रेस्क्यू टीमच्या दहा सदस्यांच्या मदतीने पुन्हा शोधमोहीम राबविण्यात आली.

# उक्कलगाव परिसराला गारपीटाने झोडपले

## पिकांचे अतोनात नुकसान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : उक्कलगाव परिसराला अवकाळी पाऊसाने आणि वादळी वाऱ्यासह गारपीटाने झोडपले.यामुळे रब्बी हंगामातील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथे बुधवारी सायंकाळी साडे पाच वाजेच्या दरम्यान दुसऱ्यादिवशी पुन्हा वादळी वाऱ्यासह गारपीटाने परिसरात जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली होती. पावसाचे तुफान वादळी वाऱ्याने




रब्बी हंगामातील गहू,मका, हरभरा,आणि कांदा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.द्राक्ष बागेचे या अवकाळी गारपीटाने मोठे नुकसान झाले. काढणीस आलेल्या गहू, हरबरा, कांदा या पिकांनाही मोठा फटका बसला आहे. गेल्या दोन दिवसापासून उक्कलगावसह परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होत असल्याने शेतकऱ्याचा तोडांशी आलेला घास हिरावून निसर्गाने नेला.

गळनिब-शिवरस्त्यावर प्रचंड वादळामुळे शेतकरी भागवत अंबादास थोरात यांचे ३ क्क्ष सोलर पंप पॅनलाचे मोठे नुकसान झाले.सोमवारी झालेल्या वादळी वार्याने शेतकरी दिपक सोपान मोरे यांच्या छताखाली दबून कावेरी गावरान जातीच्या २०० कोंबड्या मृत्युमुखी पडल्याची घटना घडली.यामुळे या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. याच शिवारातील शेतकरी बन्सी नारायण पारखे, सिंधुबाई रमेश मकासरे, भाऊसाहेब फुलपगार आणि राहुल दत्तात्रय लोखंडे यांच्याही सोलर पंप पॅनेलचे प्रचंड नुकसान झाले.शेतकरी हरिभाऊ फुलपगार यांच्या घराचे पत्रे उडून गेल्याने भिंती कोसळल्या,त्यामुळे त्यांचे प्रचंड नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर आला आहे.मात्र या नुकसानग्रस्त शेतकऱ्याचा अद्यापही पंचनामा झालेला नसून धनवाट रस्त्यावर बाबासाहेब गोपीनाथ जगधने यांच्या राहत्या घराचे पत्रे उडून गेले, तर गोपीचंद गोमाजी रजपूत यांच्याही घराचे पत्रे उडून गेल्याची घटना घडली.या ठिकाणी गाईच्या गोठ्याचे नुकसान झाले. मात्र,तेथे कोणतीही जीवितहानी झालेली नसून मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली आहे.या अवकाळी पावसात आणि वादळी वाऱ्याने रस्त्यांवर झाडे कोसळली आहेत.पावसाने गहू, कांदा, द्राक्ष, मका आणि हरभरा या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, वादळी तडाख्याने गह पीक भुईसपाट झाले आहे.त्यामुळे प्रशासनाने शेती आणि पडझड झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करावेत, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली.

### बाजारातही दाणादाण

बुधवारी उक्कलगावचा आठवडे बाजार असल्याने येथे तुफान वाऱ्यासह गारपीटाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांबरोबर व्यापाऱ्याची तारांबळ उडाली होती. या पावसामुळे शेतामालाचे नुकसान झाले.

।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



कै.माधवराव तुकाराम पा.डावखर

दि.२४/०३/२०२६ रोजी देवाज्ञा झाली आज त्यांचा...

* दशक्रिया विधी *

गुरुवार दि.०२/०४/२०२६ रोजी सकाळी ९ वा.

ठिकाण : श्री.सिद्धेश्वर मंदिर (टोका) येथे होणार आहे.

तेरावा : रविवार दि.०५/०४/२०२६ रोजी डावखर वस्ती (राहत्या घरी)होणार आहे.

स्वर्गवास दि.२४/०३/२०२६

शोकाकुल

श्री.अरुण माधव डावखर (मुलगा)
श्री.अनिल माधव डावखर (मुलगा)
सौ.सविता शिवाजी गुंजाळ (मुलगी)
सौ.रेखा किरण शिंदे (पुतणी)
श्री.वसंतराव तुकाराम डावखर (भाऊ)
श्री.बाळासाहेब तुकाराम डावखर (भाऊ)
गं.भा.लताबाई सर्जेराव शिंदे (बहीण)
श्री.महेश सदाशिव डावखर (पुतण्या)
सौ.सीमा सुरेश सोनावणे (पुतणी)

समस्त डावखर परिवार, टोका